# पराक्रमी त्रिकूट

लेखिका

मानसी मोकाशी

# पराक्रमी त्रिकूट १

## कुत्र्याशी झुंज

दिवाळीची  सुट्टी जवळ आली होती. दोन दिवसांनीच सुरू होणार होती. तसा थंडीला अवकाश होता; पण यंदा थंडी थोडी लवकरच जाणवू लागली होती. मंजिरीनं कोट आपल्याभोवती लपेटून घेतला. इकडेतिकडे बघितलं. आसपास कोणी दिसत नव्हतं. तिनं सुटकेचा निःश्वास सोडला. तिच्या बरोबरच्या सर्वांना गुंगारा देऊन ती निसटून इकडे आली होती . रानात काय काय पाहायला मिळेल, ते डोळ्यात आणि मनात साठवून घेत होती. इतर मुलं नि मुली कोंडाळं करून गाण्यांच्या भेंड्या लावत होती. पण ट्रिपला येऊन वर्गांत बसल्यासारखं वागायचं. हे मंजिरीला पसंत नव्हतं. मन्यासुद्धा भेंड्या खेळण्यातच गुंगला होता. 'बावळटच आहे', असं म्हणून तिनं नाक उडवलं आणि एक दगड पलीकडच्या उंचवट्यावर मारला.

त्या उंचवट्यावरचं गवत थरारलं. तिनं जवळ जाऊन पाहिलं, तो उंचवटा वेगवेगळ्या दिशांना पसरला होता. त्याचे चार फाटे लांब गेले होते नि एक किंचित लहान होता. आखडल्यासारखा. ते गवत जणू त्या पाच बोटांवरची लव! तिचं अंग शहारलं. केवढा मोठा हात! आपण त्यात सहज राहू. तो हात आपल्याभोवती आवळला गोला तर! ती चार पावलं मागे सरकली. पण तिचा पाय खड्ड्यांत गेला की काय कोण जाणे! ती एकदम कोसळली. मध्येच जमीनीला गेलेल्या चिरेत ती सापडली होती. कसंबसं, वर हात टेकवून पाय उंचावत ती वर आली. कोट अंगाभोवती गुंडाळत तिनं फ्रॉक झटकला. एवढ्यात खाली काही तरी चमकलं. तिनं वाकून पाहिलं. काय असेल बरं? गवतावर पडलेलं पाणी? छे! पण पाहावंच काय आहे ते, असा तिनं विचार केला.

एवढ्यांत गाडीचा हॉर्न वाजला. सर्वांनी परत येण्याची सूचना होती ती. मंजिरीला राग आला. काय हे! आत्ता कुठे मजा यायला सुरुवात झाली आहे! केस मागे सारत ती पुढे सरकली. बसच्या वाटेकडे पाठ फिरवताना जीभ बाहेर काढून तिनं मानेला हिसका दिला. हळूच एका बोटानं ती चकाकणारी वस्तू तिनं आपल्याकडे ओढली. कसली तरी धातूची वस्तू होती ती. त्या गोल वस्तूच्या सगळ्या बाजूंनी बारीक नक्षी काढलेली होती. मध्ये एक छोटंसं चित्र होतं. एका पायरीवर पाय ठेवून नि हात उंचावून तो उभा होता.

मन्या आणि सोन्या गाणी म्हणून कंटाळल्यावर एकडे तिकडे हिंडत होते. झाडांवर हिंडणारं एक फुलपाखरू सोन्यानं पकडलं होतं नि ते वहीत कसं ठेवायचं याचे बेत तो मन्याला सांगत होता. मन्या, सोन्या आणि मंजिरी हे त्रिकूट होतं. तिघं जवळजवळ राहायचे. अगदी बालमंदिरात असल्यापासून ते तिघं बरोबर असायचे.
"मंजा कुठेय कोण जाणे", मन्या म्हणाला.

“हं, तिला सवयंच आहे अशी गायब व्हायची”, म्हणून सोन्यानं नाक फुगवलं नि फुलपाखराच्या निरीक्षणाला सुरुवात केली.

“ए, ती कुठली रे फुलपाखरावरची कविता आपण म्हणायचो?” मन्यानं आठवण काढली. सोन्याला कवितेची आठवण फारशी आवडली नाही. तो नापसंतीचा सूर काढून काही म्हणणार, इतक्यांत बलभीमराव तिथं आले. ते त्यांचे सर. तसे ते त्यांना आवडायचेही. पण त्यांना पाहिलं की मंजिरीला मारुतीची आठवण यायची, म्हणून या त्रिकुटानं त्यांना बलभीमराव असं नाव पाडलं होतं. त्यांनी सर्व मुलांना गोळा करत आणलं होतंच. मन्या,सोन्यालाही सर्वांच्यात बोलावून त्यांनी कोण आहे, कोण नाही याची मोजदाद करायला सुरुवात केली ; तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की मंजिरी कुठे दिसत नाहीये. साठे बाईंनी कपाळाला आठ्या घालत डोळे बारीक करून सर्वांवरून नजर फिरवली नि मन्याला विचारलं, “कुठाय तुमची मैत्रीण?”

“मला काय माहीत?” मन्यानं फिस्कारून उत्तर दिलं. त्याला या साठेबाई मुळीच आवडायच्या नाहीत. तशा त्या कुणालाच आवडायच्या नाहीत. ‘काटेबाई’ म्हणून सगळी मुलं त्यांचा उल्लेख करायची.

“तरी मी सांगत होते,” साठेबाईंनी तारस्वरांत म्हटलं,”या कार्ट्यांना इथे आणण्यात काहीच अर्थ नाही. आता भोगा!”

“अहो, मुलं आहेत, असेल इथेच कुठेतरी ती.” असं म्हणत सरांनी वेगवेगळया वाटांनी मंजिरीचा शोध घ्यायला सुरुवात केली. संध्याकाळ होत होती. अंधार पडायच्या आत गावात पोहोचायला हवं होतं.

ते लढाऊ वीराचं चित्र असलेलं पदक मंजिरीनं एकदा न्याहाळलं. पुन्हा एकदा ते पदक तिला जिथे सापडलं होतं, तिथे पाहिलं. न जाणो, आणखीही काही खजिना असायचा. हो, उगीच गमवायला नको तो. तितक्यात तिथला उंचवटा फुगल्याचा भास तिला झाला. डोळे विस्फारून तिनं पाहायला सुरुवात केली. छे! पण हालचाल थांबली होती. मग तो नक्की भासच असेल असा तिनं विचार केला. तिला एकदम भीती वाटायला लागली. तिनं बसच्या दिशेनं बघितलं. तिथे तिला काहीच हालचाल दिसली नाही.

पण तिच्यात आणि त्या झाडादरम्यान काहीतरी काळंकाळं उभं राहात असल्याचं तिला दिसलं. हळूच त्यानं पुढचे पाय ताठ केले. तिच्याकडे रोखून पाहिलं. दाट केस होते त्याच्या अंगावर. कुत्रं! तिनं सुटकेचा निःश्वास टाकला. आपल्या भित्रेपणाला हसत मंजिरीनं विचार केला, बाजूनं गेलो की आपण पोहोचू गाडीशी. पण ती पाऊल पुढे टाकणार, तोच त्या कुत्र्यानं आपलं अंग झाडलं. नेहमीच्या कुत्र्यापेक्षा तो जरा मोठाच होता. आपले क्रूर डोळे रोखत, पिवळे दात वासत तो तिच्याचकडे येत होता. क्षणभर तिला कळेना, काय करावं! त्याच्याकडे पाठ करून तिनं पळायला सुरुवात केली. धडपडत, ठेचकाळत झाडांमधून मार्ग काढत ती पळत होती. जरा पुढे जाऊन तिनं वळून पाहिलं. त्या कुत्र्यानं तिचा माग सोडला नव्हता. पुन्हा तिनं पुढे पळायला सुरुवात केली. पायवाट गोलाकार जात होती. ती दमली नि श्वास घेता घेता तिनं पाहिलं, तर त्या कुत्र्यानं मधल्या रानांतून जवळच्या वाटेनं हुंगत हुंगत तिला जवळजवळ गाठलं होतं.

आपल्या दमण्याची पर्वा न करता तिनं पुन्हा पळायला सुरुवात केली. पण आई गं----तिच्या हाताला त्या कुत्र्यानं घट्ट धरलं होतं. तो तिला मागे ओढत होता.

कसल्या तरी आवाजाची जाणीव तिला पडता पडता झाली नि त्या कुत्र्यानं तिचं मनगट सोडलं. जणू काही चाबूक मारावा तसं ते कुत्रं मागे मागे जात होतं. मंजिरीनं आश्चर्यानं पाहिलं. समोर एक छोटीशी बाई उभी होती. तिनं हात वर केला होता. हात डावीकडून उजवीकडे हलवत ती स्थिर नजरेनं पाहात होती. कुत्रं पार मागे गेलं नि विव्हळू लागलं. दूरून एक शीळ ऐकू आली, त्यासरशी पुन्हा मागे जात कुत्रं दिसेनासं झालं.

ती काळा कोट घातलेली बाई मंजिरीच्या समोर येऊन उभी राहिली. मंजिरीला कळेना, इथे थांबावं, की मागच्यासारखंच पळावं? त्या बाईनं हात पुढे केला, तशा तिच्या हातातल्या अंगठ्या निमिषार्धात चमकल्या. एक शब्दही न बोलता तिनं मंजिरीचा हात धरला आणि तिला पायवाटेनं, एक फाटक उघडं होतं, त्या दिशेनं न्यायला सुरुवात केली. त्या दोघी जशा आत गेल्या, तसं तिनं फाटक आपल्यामागे बंद करून घेतलं.

त्या फाटकाच्या आत एक फरसबंदी अंगण दिसत होतं. बाजूला वाफ्यात झाडं होती. घराचं दार उघडून त्या दोघी आत गेल्या. आत गेल्यावर त्या बाईनं बटण दाबून खोलीतला दिवा लावला. खुर्चीकडे बोट दाखवत बसायची खूण केली. मग आपला काळा कोट खुर्चीच्या पाठीला अडकवत अर्धवट स्वतःशीच बोलावं तशी ती पुटपुटली, “मी खरं म्हणजे सांगायला हवं होतं, तो कुत्रा इथे फिरत असतो.” तिचे घारे डोळे चमकले. हसलं न हसलंसं करत ती पुढे म्हणाली, “त्याला वाटतं, त्या कुत्र्याला भिऊन मी इथेच राहीन!”

मंजिरीला वेदना असह्य होत होत्या. कण्हत ती म्हणाली, “आई गं, इतकं दुखतंय!”
“दुखतंय?” त्या बाईनं मंजिरीला विचारलं.
“हो नं.” मंजिरी म्हणाली.
“हं, त्या कुत्र्याला मारूनच टाकायला हवं खरं म्हणजे. तो----”
“कुणाचा आहे तो कुत्रा?” मंजिरीनं विचारलं. पण तिनं पाहिलं, त्या बाईचा चेहरा एकदम बदलला. चेहऱ्यावरचे स्नायू ताठ झाले.
तिनं म्हटलं,” माझं नाव ममता. तू कोण आहेस?”
“माझं नाव मंजिरी.”
“तू मला ओळखतेस?”,
“नाही,” ती म्हणाली. पण मंजिरीला वाटलं, आपण आत्ता सांगितलं ते काही पूर्णपणे बरोबर नाही. या बाईला आपण कुठेतरी पाहिलं आहे का - का नाही? – नसावंच.

ममता पुढे झाली. तिनं मंजिरीचा हात दिव्याजवळ नेऊन जखम तपासली. भिंतीतल्या कपाटातून बोटभर लांब डबी काढून तिच्यातलं मलम जखमेवर हळुवार हातानं लावलं. ममताचा हात

हलका होता. ती मलम लावत असताना दुखणार म्हणून मंजिरीनं स्---- असा आवाज काढत डोळे मिटले होते. पण ममतेनं मलम केव्हा लावलं ते तिला कळलंच नाही.

आपले घारे डोळे भिंतीवर स्थिर ठेवून ममतेनं मंजिरीला विचारलं, “तू इथं काय करत होतीस?” हळूहळू आपल्या सहलीची माहिती मंजिरीनं सांगितली.
“मग बाकीची मंडळी कुठे आहेत?”, ममतेनं विचारलं.
“तिकडे आमराईत. मी एकटीच इकडे भटकत होते. माळावर,” मंजिरीनं उत्तर दिलं. “तिथं तू काय पाहिलंस?” ममतानं पाठोपाठ प्रश्न केला.
“मला- मला घरी जायचंय,” मंजिरीच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले.
“तू तिथे काय पाहिलंस?” ममतेनं पुन्हा प्रश्न केला. त्या आवाजात जरब होती. डोळे खाली करत मंजिरीनं म्हटलं, “मी कुत्रा पाहिला.”
“हो?”
“हो”, म्हणत मंजिरीनं स्मित केलं. कोण असावी ही बाई हा प्रश्न तिच्या मनात पिंगा घालत होता. “काही लोक मोठे शहाणे असतात.” ममता पुटपुटली. ठीक आहे. ममता जर आपल्या सगळं सांगत नाही, तर आपणही तिला काही फारसं सांगायचं नाही असा विचार मंजिरीनं केला. कोणी काहीही न मारता चाबकाचे फटकारे खाल्ल्यासारखं त्या कुत्र्याचं ओरडणं मंजिरीला आठवलं. पुन्हा वळून पाहात ममतेनं पुढे केलेल्या हातात आपला हात अडकवत ती बाहेर पडली.

मंजिरी आणि ममता त्या घराच्या बाहेर पडल्या तेव्हा फक्त घरी परतण्याचे विचार मंजिरीच्या मनात होते. तिनं इकडे तिकडे पाहिलं. लांबवर प्रकाशाचा झोत आणि हाका तिला ऐकू आल्या. आवाज आणि तो प्रकाश जवळ येत होता. “सर, मी इकडे आहे,” मंजिरीनं हाक दिली.
“मंजिरी—",
“हो सर,” मंजिरीनं प्रतिसाद दिला. सर आणि त्यांच्याबरोबर मुलांचं एक टोळकं आलं. त्यांनी या दोघींना गराडा घातला. काय झालं ते मंजिरीनं त्यांना सांगितलं. ममतेनंही आता बोलायला सुरुवात केली आणि ती सर्वजणं बसच्या दिशेनं चालायला लागली.
“........आणि तेव्हा झाडं खूप हलत होती.” मंजिरीनं सांगायला सुरुवात केली.
“हो, वारा आला की झाडं हलणारच. आत्ता सुद्धा ती हलताहेत पाहा—” कुणीतरी म्हणालं.
“पण तेव्हा वारा नव्हता,” असं मंजिरीनं म्हणताच ममतेच्या हाताची पकड घट्ट झाल्याची जाणीव मंजिरीला झाली. ती एकदम गप्प झाली.
“शहाणी मुलगी आहेस तू. सांगितलं की समजतं. नाही समजू असं वाटलं की सांगू नाही.” कोड्यांत बोलावं तसं ममता बोलली. “काही म्हणालात तुम्ही?” सरांनी विचारलं. “उशीर होतोय तुम्हाला,” ममतेनं विषय बदलत म्हटलं. “आपले उपकार आहेत आमच्यावर,” सरांनी हात जोडत म्हटलं. “पण ते कुत्रं तुम्ही हकललंत कसं?” “ते मला पाहिल्यावर पळून गेलं,” असं म्हणून ममता पुन्हा मंजिरीकडे पाहून हसली. मंजिरीनंही हसूनच उत्तर दिलं. ममताचं हास्य

जणू मंजिरीला सांगत होतं, जास्त काही सांगू नकोस. बरं बाई! तिला जर गुप्तता ठेवायची असेल तर राहीना! मला काय!! असाच मंजिरीनंही विचार केला.

"या असल्या कुत्र्याला मात्र कुणी मोकळं सोडू नये, कुणाचा आहे तो कुत्रा?"
"त्याचा मालक ......"
"कोण आहे?"
"मला त्याचं नाव माहीत नाही, माहिती असतं तर.." तेवढ्यात साठे बाई इतर मुलांना घेऊन तिथे येऊन पोहोचल्या.
"काय बाईसाहेब, कुठे होतात?" कमरेवर हात ठेवून, भुवया उंचावून त्या प्रश्न करत्या झाल्या.
"एका कुत्र्यानं हल्ला केला तिच्यावर," मन्यानं पुढे येऊन सांगितलं.
"मी तुझ्याशी नव्हते बोलत. तू मंजिरी आहेस का?" साठेबाई आवाज चढवत म्हणाल्या. त्याबरोबर एकच खसखस पिकली.
मंजिरीला बाजूला घेत मन्या म्हणाला," कुठे जात्येस ते सांगितलं असतंस तर आम्ही नसतो का आलो?"
"हो, अरे पण मला काय माहीत...."
"लागलं का?" बाईंनी विचारलं.
"नाही फारसं," मंजिरी उत्तरली.
"चला आता आणखी काही व्हायच्या आत. तरी मी म्हणत होते, - असल्या इरसाल कार्ट्यांना रानात आणण्यात अर्थ नाही. पण काय! शास्त्र शिकवतात म्हणे! नवीन पद्धती!!" पण त्यांचं बोलणं हवेतच विरलं. बसमध्ये चढताना जागा पकडायला सगळ्यांनी एकच गलका करायला सुरुवात केली.

खरं म्हणजे मंजिरी येतानाही खिडकीजवळच बसली होती. पण आत्ताच्या प्रसंगानं खिडकीजवळ बसण्याचा मान तिलाच मिळाला होता. तिनं आपल्या जखमेवर हळूच फुंकर घातली. मन्या खिशात हात घालून विचार करत होता, ती छोटीशी घाऱ्या डोळ्याची बाई कोण असेल? त्यानं कोपरानं मंजिरीला ढोसत विचारलं,"मंजा, ती तुझ्या बरोबरची बाई कुठेय? या अंधारात ती एकटीच गेली?"
"खरंच की. मी विसरलेच होते बसमध्ये चढण्याच्या नादात!" त्यांनी वळून लांबवर टॉर्चचा प्रकाश पाडून पाहिलं. ती कुठेच दिसली नाही.
"तिनं एवढं वाचवलं मला, पण मी निरोपसुद्धा घेतला नाही तिचा," मंजिरी हळहळली.
"नेहमीप्रमाणे बावळटपणा," सोन्यानं डोळे बारीक करत फुसकुली सोडली. रागानं त्याच्यावर हात उगारणार, तेवढ्यात बस सुटली आणि मंजिरी तिच्या जागेवर कोसळली. मन्या, सोन्याच्या हसऱ्या डोळ्यांकडे पाहायचं टाळत, खिडकीच्या काचेवर डोकं टेकून बाहेर बघायला तिनं सुरुवात केली. आतापर्यंत अंधार झाला होता. मगाचच्याच आठवणींनी आणि ममता आली नसती तर आपलं काय झालं असतं या विचारानं तिच्या पोटात कसंनुसं झालं. त्या काळोखात सरकणारे सावल्यांचे वेगवेगळे आकार न्याहाळायला तिनं सुरुवात केली.

वळणावर बसचे दिवे लकाकले नि डाव्या बाजूलाही काहीतरी लुकलुकलं. डोळे विस्फारून तिनं पाहिलं, दोन डोळे तिला दिसले.
“काही दिसलं तुला?” मन्यानं विचारलं.
“तो बघ तिथे... तो!” म्हणून तिनं बाहेर बोट दाखवलं.
“काय आहे रे?” सोन्यानं पलीकडून विचारलं; तशी सगळींच उत्सूकतेनं पाहायला लागली. पण मन्याशिवाय तो कुत्रा कुणालाच दिसला नाही. सरांनी बाहेर पाहात म्हटलं, “काही नाही, घाबरू नका. बसमधल्या दिव्याचं प्रतिबिंब आहे ते.” त्यांनी मंजिरीच्या खांद्यावर थोपटलंसं करत स्मित केलं आणि स्कार्फ गळ्याभोवती गुंडाळत ते इतर मुलांबरोबर पत्ते खेळायला जाऊन बसले.

मंजिरी बाहेर बघत होती. तिच्या छातीत धडधडत होतं. ओठावरून जीभ फिरवत तिनं मान मागे टेकली. चंद्र वर आला होता. बाहेरचं चांगलं दिसत होतं. बसच्या बरोबर थोडं अंतर ठेवून विलक्षण वेगानं एक काळी सावली धावत होती. गुरगुरण्याचा आवाज वाऱ्याच्या झुळकेबरोबर येत होता.

********

# पराक्रमी त्रिकूट- २

## हरित मानव

मन्या बाहेर पाहात होता. त्यानं वळून सोन्याकडे पाहिलं. स्वारी डोळे मिटून बसली होती. झोपेत होता की काय कोण जाणे! त्याच्या खांद्यावर हात ठेवून उठवायला मन्या पुढे सरकणार, इतक्यात मंजिरीनं त्याला गप्प बसायची खूण केली.

“नको!” तिनं हळूच म्हटलं.

“का?” मन्यानं भुवया उंचावल्या.

“त्याला नाही समजत, उगीच हसेल तो,” मंजिरी म्हणाली. मन्यानं मान डोलावून डोकं मागे टेकलं. पण आता त्याचं सगळं लक्ष मंजिरीच्या हालचालींकडे नि बाहेर धावणाऱ्या कुत्र्याकडे होतं. मंजिरीनं थोडा वेळ विचार केला. तिच्या मनाचा निश्चय होत नव्हता. मघाशी सापडलेली ती गम्मत त्याला दाखवावी की नाही? पण तिला त्या विचाराचा एकटेपणा सहन होईना. खिशात हात घालून तिनं ते पदक चाचपलं. मूठ मिटलेली ठेवून मांडीजवळ तिनं ठेवली. मन्याचं लक्ष तिच्या मिटल्या मुठीनं वेधलंच होतं. मंजिरीच्या तोंडावर स्मित झळकलं. क्षणभर ती भीतीही विसरली. खरं तर मन्याची उत्सुकता ताणली जात होती, तरी मन्यानं काही म्हणायचं नाही, विचारायचं नाही असं ठरवलं होतं.

मंजिरीनं हळूच मूठ उघडली. ते पदक उजेडात चमकलं. पण तिनं मन्याला त्या पदकाला हात लावू दिला नाही. सावकाश, मध्येच थांबत तिनं आपण रानात कसे गेलो, कसे पडलो, पदक चकाकताना आपल्याला कसं दिसलं ते सगळं मन्याला सांगितलं. तिचे ओठ थरथरत होते, तिनं ते पदक तिच्या मुठीत घट्ट धरून ठेवलं, जसं काही कुणी ते तिच्या हातातून काढूनच घेणार होतं! तिच्या डोळ्यासमोर सगळे प्रसंग येत होते. जणू सगळा नजीकचा भूतकाळ ती पुन्हा जगत होती. त्या भासनाट्यातल्या ममताच्या प्रवेशानंतर तिचा आवाज जरा स्थिरावला. सरांनी त्या दोघांना संभाषणात गुंतलेलं पाहिलं. हं----- असं म्हणत ते स्वत:शीच हसले. आधीच मर्कट, त्यातचि मद्य प्याला, आता काही विचारायला नको, ही दोघं पोरं आधीच वेड्यासारख्या कल्पना करतात, आता आजच्या घटनेतून काय कथा तयार करतील कोण जाणे, असा विचार त्यांच्या मनात आला.

“तिला माहिती आहे तो कुत्रा कुणाचा आहे तो.” मंजिरीनं पुन्हा सांगायला सुरुवात केली, “अरे, ती माझ्याशी असं बोलत होती, जसं काही मला सगळं काही माहितीच आहे.” मन्यानं बाहेर पाहिलं. बाहेर काहीच दिसत नव्हतं. कसलाच आवाजही येत नव्हता. बहुतेक कुत्रा मागे निघून गेला असावा या विचारानं मंजिरी आणि मन्यानं एकमेकांकडे एकाच वेळी पाहिलं. नंतर कुणीच फारसं काही बोललं नाही. दोघंही आपआपल्या विचारांत बुडून गेली होती.

बस थांबली. शाळा आली होती. सगळ्यांनी आपआपलं सामान उचलत खाली उतरायला सुरुवात केली. मंजिरी, मन्या आणि सोन्या सरांकडे गेली . “सर, जातो आम्ही आता,”

“थांबा रे, मी येतो तुम्हाला पोचवायला,” सर म्हणाले.

“नको सर, आम्ही जवळच राहातो.” सोन्यानं म्हटलं. पण संध्याकाळच्या रानातल्या प्रसंगाचं वृत्त सांगायला सरांनीच यायचं ठरवलं होतं. मंजिरी मुकाट्यानं त्यांच्याबरोबर चालायला लागली. मागून मन्या आणि सोन्या गळयात गळे घालून येत होते. अशी ही यात्रा मंजिरीच्या घरापर्यंत येऊन पोहोचली.

“उद्या शाळेत जाताना—" दोघं म्हणाले.

“हो!” असं म्हणताना मंजिरीचे डोळे मागे अंधारात पाहाला लागले. त्यासरशी ती मागे सरकली.

“काय झालं आता?” सरांनी विचारलं. दिवसभराच्या प्रवासानं आणि सहलीतल्या कटकटीनं ते एव्हाना वैतागले होते, “आता काय दिसलं?”

“तो कुत्रा.” मन्यानं मागे अंधारात पाहात म्हटलं. चौकातल्या दिव्याखाली मोठी थोरली जीभ काढून तो बसला होता. दर श्वासागणिक त्याचं सगळं शरीर वर खाली होत होतं. “हं, मला तर काहीच दिसत नाही, काय रे, तुला दिसतंय?” सोन्याला सरांनी विचारलं.

“नाही बुवा!” चश्मा सावरत सोन्या उत्तरला.

“या असल्या कल्पनांनी उद्या वाऱ्यावर उडाल! तू खरं तर कादंबऱ्याच लिहायच्यास,” सर म्हणाले. त्यांनी मंजिरीला जवळजवळ तिच्या घराच्या फाटकाकडे ओढलं. मन्या आणि सोन्या त्यांच्या घराकडे वळले. तो कुत्रा दिव्याखाली बसून ती तिघं कुठे जाताहेत याचं निरीक्षण करत होता.

दुसऱ्या दिवशी मंजिरी घरातून बाहेर पडली तेव्हा मन्या आणि सोन्या खांद्यावर दप्तरं अडकवून तयारच होते.

“आज शाळेचा शेवटचा दिवस नि मग सुट्टी.” बोलायला सुरुवात करत मन्यानं म्हटलं. “संजू नाही आज तुझ्या बरोबर?”

मंजिरीनं मान हलवत म्हटलं, “आज तिची मी आधीच रवानगी केली शाळेत.”

“बरं झालं.” मन्यानं म्हटलं, “काय झालं काल रात्री?”

“काही नाही विशेष,” तिला सांगताना हंसू फुटत होतं. “सर सारखे सांगत होते, माझंच चुकलं, त्यामुळेच मंजिरीवर ही पाळी आली.”

मन्याचे दोन्ही भाऊ तिथे आले, त्यांना पाहताच मन्या म्हणाला, “थांबा, आधी त्यांना वाटेला लावून येतो.” मन्यानं पुढे जाऊन काहीतरी सांगितलं, मग दप्तरं सावरत ती दोघं घाईघाईनं निघून गेली. त्यांच्याकडे पुन्हा एक दृष्टिक्षेप टाकत मन्या पहिल्या जागी येऊन पोचला.

“सुटलो, नाही तर त्यांना काय काय कल्पना सुचतील---" कपाळाला हात लावत मन्यानं म्हटलं.

“काय म्हणायचंय तुला? सरळ म्हणून टाक एकदा,” मंजिरी म्हणाली.

खांदे उडवून सोन्या गप्प बसला. नेहमीप्रमाणे मन्यानं मध्ये पडत म्हटलं, “हं, बोला, पुढे काय झालं काल रात्री?”

“का- - ही नाही. सरांनी काय झालं ते माझ्या घरी सांगितलं आणि ते निघून गेले. बस्!” गाल फुगवत मंजिरीनं समोर पाहात चालायला सुरुवात केली.

माघार घेत सोन्यानं चश्मा नीट नाकावर चढवला आणि सुरुवात केली, “तुला सांगायचं होतं काही तरी.”

“काय?”

“विचार करताना मन्याला काहीतरी सुचलंय.”

“काय?”

“एक थियरी.” डोळे विस्फारत प्रश्नार्थक मुद्रेनं तिनं दोघांकडे पाहिलं.

मन्यानं खुशीत येत म्हटलं, “त्याचं काय झालं, आम्ही दोघं विचार करत घरी गेलो. माझ्या डोक्यात तू सांगितलेलंच सगळं होतं. तर जेव्हा मला झोप लागली, तेव्हा –अगं मी स्वप्नात एक हिरवागार माणूस पाहिला.

“काय?”

“हो ना. आणि जागा झालो तो इतका घाम फुटला मला म्हणून सांगू—पुन्हा डोक्यात तेच विचार. विचार करता करता मला एकदम परवा वाचलेल्या पुस्तकाची आठवण झाली. ते गं—ते निळ्या जांभळ्या कव्हराचं, लोककथांचं. त्यावरूनच मला एक थियरी सुचलीय.”

“पण त्या पुस्तकाचा काय संबंध इथे?”

“ऐकून तर घेशील? तू जो बोटांसारखा उंचवटा पाहिलास नं, ती बोटंच होती. हरित मानवाची.

“कुणाची?”

“ह रि त मा न वा ची.” एकएक अक्षर उच्चारत मन्यानं सांगितलं. सोन्यानं खोकल्यासारखं केलं. मन्यानं एकदा त्याच्याकडे पाहिलं आणि मंजिरीकडे पुन्हा वळत बोलायला सुरुवात केली. पण मंजिरीला कालची आठवण झाली होती. तिनं मागे वळून पाहिलं. फ्रॉकच्या खिशात घातलेल्या मुठी वळल्या. मागे अर्धवट वळत तशीच उभी राहिली. मन्यानंही मग वळून पाहिलं. आपल्या खिशातला छोटा चाकू काढून त्याचं पातं बाहेर काढत तो उभा राहिला.

“हं, म्हणजे आता तरी तुला दिसतोय तो.” मन्याच्या आवाजात विजय होता.

“हो, मजा आहे नाही?” सोन्यानं म्हटलं.

“कसली?” थांबत मन्या म्हणाला, “आणखीही एक कुत्रा आहे तिथं. तो $ तपकिरी.”

दोघांनी वळून पाहिलं. तिथे एक बाई कुत्र्याला साखळी बांधून नेत होती. रागात सणसणीत उत्तर देऊन सोन्याला मंजिरी गप्प करणार इतक्यात मंजिरीनं त्याची बाही ओढून लक्ष वेधलं, मान हलवली आणि ती पुन्हा मागे पाहात राहिली. मग सोन्या आणि मन्यानंही त्याच दिशेनं पाहिलं. त्या काळ्या कुत्र्याच्या

जवळ एक माणूस उभा आहे असं त्यांना वाटलं. त्यानंही काळेच कपडे घातलेले होते. कुत्र्याजवळ शेजारच्या भिंतीवर रेलून तो उभा होता. मोठं डोकं, रुंद खांदे आणि लट्ठ शरीर. तोंडाच्या जागी मोठी रेघ दिसत होती. डोळे जणू दगडात खोदावेत तसे. पण जिवंतपणा म्हणावा तसा त्याच्यात कुठेच दिसत नव्हता. तो या तिघांकडे स्थिर नजर लावून उभा होता.

थोडा वेळ काहीच झालं नाही. अखेर एखाद्या यंत्रानं फिरावं तसं तो फिरला आणि घराच्या सावलीत दिसेनासा झाला. कुत्राही त्याच्या पाठोपाठ गेला. वातावरणच बदलल्यासारखं झालं होतं. उदासपणा संपत नव्हता. कितीतरी वेळ कोणीच बोललं नाही. हे सर्व कल्पनेचे खेळ आहेत असं म्हणणारा सोन्या, पण तोही गप्प होता. पण शाळेला उशीर होतोय, असं म्हणत तोच पहिल्यांदा भानावर आला. सगळयांनी चालायला सुरुवात केली. शाळा जवळ येत चालली होती.

"तो- तो होता." मंजिरीनं म्हटलं.

"तो?"

"तो म्हणजे ममता ज्या माणसाबद्दल बोलत होती- तो. त्या कुत्र्याचा मालक. तो मंजिरीला भिववायला पाहात होता. याला पाहून कोणीही घाबरेल. पण त्या हरित मानवाचं काय रे? अर्धवटच सांगितलंस तू."

"हो, सांगतो, पण शाळा आली. मग शाळा सुटल्यावर सांगतो सगळं." मन्यानं म्हटलं आणि ते शाळेत शिरले.

शाळा सुटल्यावर तिघं पुन्हा एकत्र जमले. सर्व मुलामुलींच्या गलक्यापासून दूर. आंब्याच्या झाडाखाली. मन्याला उशीर झाला. पण सोन्यानं विचारात दंग असल्याचं दाखवलं आणि मंजिरी रिबीनीशी चाळा करत शाळेच्या इमारतीकडून येणाऱ्या प्रत्येक मुलाकडे पाहात राहिली. मन्या येताना दिसला तशी ही कट्टी संपली. नेहमी असंच व्हायचं. मन्या आणि मंजिरी यांचं बऱ्याच बाबतींत जमायचं. तशी ती भांडायची नाहीत असं नाही, पण ती क्षणिक असायची. पाच मिनिटांनी पुन्हा गट्टी सुरू होऊन हुंदडायला तयार. पण सोन्या जरा वेगळा मुलगा होता. कुणी एखादी गोष्ट रंगवून, भडक करून सांगितली तर त्याचा त्यावर विश्वास बसायचा नाही. स्वतःला पटेल त्याच्यावरच विश्वास ठेवायचा आणि तसंच वागायचा. त्यामुळे त्याचे आणि मंजिरीचे नेहमीच खटके उडायचे आणि मन्या मधे पडून ते मिटवायचा. आताही तसंच झालं. मन्या आल्यावरच युद्धबंदी झाली.

"सांग आता तुला काय सांगायचं होतं ते." उत्सुकतेनं मंजिरी म्हणाली.

"हो," घसा खाकरत मन्या म्हणाला. मधे थोडा वेळ गेल्यावर त्याची उत्सुकता कमी झाली होती. त्याची जागा आता शंकेनं घेतली होती. आपलं म्हणणं बरोबर असेल की नाही आणि ते या दोघांना पटेल की नाही अशी भीती त्याला वाटायला लागली होती.

त्याच्या मनातली शंका ओळखून मंजिरीनं म्हटलं, "सांग रे, त्या सोन्याकडे काही लक्ष देऊ नको. समोर लख्ख दिसणाऱ्या वस्तूलाही मृगजळ म्हणेल तो. त्याला वाटतं, असं वागलं की आपण अगदी न्यूटन झालो. कल्पना कशाशी खातात ते माहीत तरी आहे का त्याला?"

“हो, असू दे. आम्ही हवामहल नाही बांधत. तुम्ही असता पऱ्यांच्या राज्यात. आता हीच याची थियरी घे —”

“अरेच्चा! पण ती थियरी तरी काय आहे ते अजून मला कुणी का सांगत नाही? डोन्ट बीट अबाऊट द बुश. म्हणजे सगळं सांगून टाका. इकडे तिकडे करत बसू नका.”

“बरं, बरं. माहितीय इंग्लिश पाणी भरतंय ते. रहा कल्पनेच्या राज्यात. माझं काहीही म्हणणं नाही.” असं म्हणून सोन्यानं खांदे उडवले.

मन्यानं अधिक काही न बोलता त्यांना ग्रंथालयाच्या दिशेनं न्यायला सुरुवात केली. सूर्य अस्ताला निघाला होता. ग्रंथालयातली ओळीनं लावून ठेवलेली कपाटं कवायतीला उभ्या असलेल्या मुलांप्रमाणे ताठ, शिस्तीत उभी होती. घराच्या आणि खाऊच्या ओढीनं मुलांचा लोंढा घराच्या दिशेनं वाहात होता. ग्रंथालयातलं भलं मोठं टेबल आणि भोवतीच्या खुर्च्या वाचकांची वाट पाहात रिकाम्याच होत्या. मन्यानं तिथल्या शेल्फातून त्याला हवं होतं ते पुस्तक काढलं. त्या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेत त्याला हवी असलेली गोष्ट तो शोधायला लागला. एवढं मोठं पुस्तक पाहून मंजिरीच्या पोटात गोळाच उठला. ‘एवढं मोठं पुस्तक ही स्वारी आपल्याला वाचून दाखवणार की काय!’ कारण मन्याला सवय होती, तो एकदा रंगात येऊन बोलायला लागला किंवा वाचायला लागला की त्याला वेळेची अजिबात शुद्ध राहायची नाही. जरी दिवाळीची सुट्टी आजपासून सुरू झाली असली तरी घरी जायला फार उशीर झाला तर आई नक्कीच रागावली असती. तिनं टेबलावर कोपर टेकवत खुर्चीला दप्तर अडकवत म्हटलं, “मन्या, पण आता हे सगळं वाचून दाखवू नको बाबा. थोडक्यात तोंडीच सांग कसा.”

ओठावरून जीभ फिरवत, एक पाय दुसऱ्या पायात अडकवत मन्यानं सांगायला सुरुवात केली. स्वारी रंगात येत चालली होती. मावळतीची किरणं त्याच्या गोऱ्या चेहऱ्याला तांबुस छटा आणत होती. हातातल्या पेन्सिलीनं त्यानं टेबलावर ठेका धरला होता.

“तुम्ही कधी दगडात खोदलेली लेणी पाहिली आहेत? त्या पांडवपुराच्या तिकडे अशी खूप मोठी लेणी आहेत. तिथेच ही गोष्ट सुरू होते. तिथे भल्यामोठ्या दगडांवर खूप खूप वर्षांपूर्वी काही माणसांनी शूर-वीरांची चित्रं खोदली. ती खूपच सुंदर होती. मनुष्याच्या आकाराचीच होती. त्यांना बघून वाटायचं, हे शूर योद्धे घोड्यावर मांड ठोकून हा हा म्हणता दिसेनासे होतील, नाहीतर कमरेची तलवार उपसून चारी बाजूंनी तलवार फिरवायला लागतील.

“अशाच एका योद्ध्याचं चित्र एका मांत्रिकाला फार आवडलं आणि त्यानं त्या चित्रात जीव भरला. तो योद्धा जिवंत झाला. त्याच्याबरोबर त्याचा घोडाही. त्यानं घोड्याला टाच मारली आणि तो पलीकडच्या झाडीत दिसेनासा झाला. त्यानं भलंमोठं सैन्य तयार केलं. तेव्हा कुठे शहरं नव्हती. छोटीछोटी गावं होती. त्या गावांवर तुफानी वेगानं हल्ले करून ती जिकत तो निघाला. महाराष्ट्रातून गुजरातेत, मग माळवा, मग बंगाल, बिहार असं करत करत तो पुन्हा महाराष्ट्रात आला. त्यानंतर तो इथेच आहे. त्याचा अंत हरितमानवात झाला असं म्हटलं आहे. अशाच लोककथा इतरही ठिकाणी- तो योद्धा ज्या मार्गानं गेला होता, त्याही ठिकाणी आहेत.”

“मग म्हणायचंय काय तुला? त्या गोष्टीतला हरितमानव मंजूनं त्या दिवशी पाहिला? - - त्याची बोटं तिला दिसली?” उपहासानं सोन्यानं विचारलं.

“टिंगल नको करू. या गोष्टी खोट्या आहेत असं वाटलं तरी त्यात काही प्रमाणात सत्याचा अंश असतो. त्या ट्रॉयच्या गोष्टीचं नाही का?”

“काय ट्रॉयच्या गोष्टीचं? हेलनचा लाकडी घोडा सापडला?”

“नाही, पण जिथे धन सापडेल असं म्हटलं होतं गोष्टीत, तिथे धन खरोखर सापडलं.”

“मग काय म्हणणं आहे तुझं?”

“त्या वेळी असं काहीतरी नक्की घडलं असलं पाहिजे. एक शास्त्रज्ञ त्या विशिष्ट ठिकाणी गेला आणि त्यानं संशोधन केलं तेव्हा ती योद्ध्याची आकृती जणू काही उपसून काढली आहे अशी दिसली.”

त्यानं मंजिरीकडे पाहिलं. तिच्या डोळ्यात काहीतरी सापडल्याचा भाव दिसत होता. मन्याला समाधान वाटलं. त्यानं सोन्याकडे पाहिलं. तो ते पुस्तक घेऊन त्याची पानं चाळत होता. हळू आवाजात मन्यानं म्हटलं, “मला असं वाटतंय, काहीतरी घडतंय.”

“काय?”

“तिकडे—त्या माळरानावर. मला वाटतंय, त्या हरित मानवाबद्दल त्या ममतेला काहीतरी माहिती आहे.”

ममतेचं नाव निघाल्यावर पुन्हा एकदा मागच्या भयानक आठवणी तिच्या मनांत उभ्या राहिल्या. मन्याच्या बोलण्यावरून त्याला तिथे जाऊन वस्तुस्थिती पाहायची आहे हे तिला जाणवलं. या सगळ्या भानगडींतून बाहेर पडता आलं तर किती बरं होईल असंही तिला वाटून गेलं. पण यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडत नव्हता. आपण आपल्या नकळत या गुंत्यात सापडत चाललो आहोत असं तिला वाटू लागलं.

पुस्तकातून डोकं वर काढत सोन्यानं म्हटलं, “तू संशोधन करणार म्हणाला होतास.”

“हो.”

“मग हे पुस्तक वाचणं म्हणजे संशोधन आहे असं तुला वाटतं का?”

“नाही. म्हणून तर मी म्हणत होतो की आपण परवा गेलो होतो त्या ठिकाणी रानात जाऊन काय खरा प्रकार आहे ते पाहू या.”

“पण त्याआधी आपण पदार्थसंग्रहालयात गेलो तर? तिथे मला वाटतं काहीतरी सापडेल आपल्याला.”

सोन्याचं हे बोलणं मंजिरी आणि मन्याला अगदीच अनपेक्षित होतं. त्यावरून—त्याला जरा तरी या दोघांचं म्हणणं पटत असावं- जरी तो तसं दाखवत नसला तरी! या विचारानं मंजिरीला जरा बरं वाटलं. तिघंही उठली आणि ग्रंथालयाच्या बाहेर पडली. घरी जाऊन थोडंसं खाऊन पुन्हा भेटायचं असं तिघांनी ठरवलं.

खेळायला जातो असं सांगून मंजिरी, मन्या आणि सोन्या बाहेर पडले. न बोलताच त्यांचे पाय वस्तुसंग्रहालयाकडे वळले. मंजिरीच्या एका बाजूनं मन्या चालला होता आणि दुसऱ्या बाजूनं मन्या. वस्तुसंग्रहालय जराशा जुन्या वस्तीत होतं. त्यामुळे रस्ते छोटे होते. दिवेही लहान आणि लांब लांब होते. शिवाय रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या दुकानांच्या दिव्यांच्या झगमगाटाची सवय झालेल्या डोळ्यांना तिथला कमी प्रकाश जास्तच जाणवत होता. एखाददुसरा वाटसरू रस्त्यानं जात होता. रस्त्यानं गाडी गेली की तेवढ्यापुरता रस्ता उजेडानं भरायचा आणि मग पुन्हा अंधाराचं साम्राज्य पसरायचं.

किती वाजेपर्यंत वस्तुसंग्रहालय उघडं असतं याची त्यांना कल्पना नव्हती. त्यामुळे झपाझप पावलं टाकत ती चालली होती.  शिवाय आदल्या रात्रीच्या कुत्र्याची आठवण भेडसावत होती ते वेगळंच. कोपरा आला की त्या अंधारात त्यांना जास्तच भीती वाटायची. जीव मुठीत धरून कोपरा ओलांडला की त्यांचे जीव भांड्यात पडत. मध्येच मन्याला ठेच लागली आणि तो अडखळला तेव्हा मंजिरी आणि सोन्याला पहिल्यांदा कळलंच नाही काय झालं ते. कुत्र्याबित्र्यानं उडी मारून त्याला पकडलेलं नाही हे त्यांनी पाहिलं तेव्हा सुटकेचा निःश्वास टाकून त्याला उठवलं आणि पुढे चालायला सुरुवात झाली.

वस्तुसंग्रहालयाच्या दाराशी जरी ती येऊन पोहोचली तरी मन्या आत शिरण्याचं चिन्ह दिसेना.

“पोचलो एकदाचा,” म्हणत सोन्यानं दाराच्या दिशेनं मोर्चा वळवला.

पण मन्यानं त्याचा हात धरून त्याला मागे फिरवलं नि म्हटलं, “पण राव, आपल्याला इथे जायचं नाहीये.”

************

# पराक्रमी त्रिकूट-३

## भूतबंगल्यात

"नाही, आपल्याला त्या टेकडीवरच्या वस्तुसंग्रहालयात जायचंय."

"टेकडीवरच्या? अरे ते काय संग्रहालय आहे? तो आहे भुतांचा वाडा. त्या येडपट श्रीमंत माणसाला आली लहर, त्यानं दिला म्युनिसिपालिटीला, आता तर म्हणतात, त्याचं भूत आहे तिथे. म्हणून कुणी वापरत नाही ती जागा. रिकाम्या जागी चार तोडक्या, मोडक्या वस्तू ठेवल्या आहेत तिथे झालं!"

सोन्याच्या मनात नाराजी होती. पण त्या संग्रहालयाच्या वेगळेपणानंच मन्याला भारलं होतं. त्यानं सोन्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण जरी नक्की आपल्याला काय सांगायचं आहे ते त्याला सांगता आलं नाही, तरी त्यानं पुढे केलेल्या वेगळ्या कल्पनेबद्दल मंजिरीलाही आकर्षण वाटायला लागलं. त्यामुळे भूतबंगल्यात जाण्याच्या त्या दोघांच्या उत्साहापुढे सोन्याला मान तुकवावीच लागली.

ती तिघं पुढे चालू लागली. मार्ग चढाचा होता. बाजूची झाडं सळसळली की त्यांच्या अंगावर काटा उभा राहायचा. टेकडीवरचं संग्रहालय जसं त्यांना दिसलं, तशी त्यांची चाल मंदावली. ती हळूहळू संग्रहालयाच्या दाराशी येऊन पोहोचली.

संग्रहालयाच्या दारासमोर एक मोठा जिना होता. जिन्याच्या दोन्ही बाजूंनी दोन मोठे पुतळे होते. ते जणू एकमेकांकडे अनिमिष नेत्रांनी पाहात होते. जिन्याच्या प्रत्येक पायरीच्या शेजारी भिंतीवर वेगवेगळ्या वस्तू टांगून ठेवलेल्या होत्या. पायऱ्यांवर जाजम अंथरलेलं होतं. त्यामुळे त्यांच्या पावलांचा आवाज जवळजवळ येतच नव्हता.

ती जिना चढून वर आली. तीन बाजूंना तीन दालनं होती. त्यांनी पहिल्यांदा डावीकडच्या दालनात प्रवेश केला. तिथे वेगवेगळ्या प्रकारची झुंबरं आणि दिवे लटकवलेले होते. त्यामुळे ते दालन चांगलंच प्रकाशित झालेलं होतं. सर्व वस्तू जुन्या असतील आणि यापूर्वी किती वेगवेगळ्या वातावरणात राहिल्या असतील! असे विचार त्यांच्या मनात येत होते. कोपऱ्यात एक लाकडी पेटी होती. तिच्यावर एक नाव लिहिलेलं होतं. ते नाव वाचत मंजिरी उभी राहिली. ती पुटपुटली, "या माणसानं या पेटीतल्या हरित मानवाला पाहिलं असेल, नाही?" तिच्या तोंडातून हे शब्द बाहेर पडले आणि तिथलं वातावरण एकदम जड झालं आहे असं त्यांना वाटायला लागलं.

सोन्याला त्या प्रकारात काहीही रस वाटत नव्हता. तो दुसऱ्या खोलीत शिरून तिथे पाहणी करत होता. तिथे निरनिराळे नकाशे लावलेले होते त्यांच्यावरून त्यानं नजर फिरवायला सुरुवात केली. मंजिरी आणि मन्याही तिथे येऊन पोहोचले. सोन्यानं त्यांनाही ते नकाशे दाखवायला सुरुवात केली. पूर्वी त्या रानाच्या भागात जे उत्खनन झालं, ज्या ठिकाणी काही प्राचीन अवशेष सापडले होते, त्या भागाचा तो नकाशा होता. त्याच्यावरून बोटं फिरवत सोन्या म्हणाला, "पहा, ही ती जागा. इथे मंजूवर हल्ला झाला होता. या बाजूला फक्त रान दाखवलंय या नकाशात. उत्खननाचा भाग यापासून लांब आहे."

“पण याच्यावरून काय सिद्ध होतं?” भिवया उंचावत मन्यानं विचारलं.

“हो नं. या ठिकाणी संशोधन करायचं राहिलं असेल!” मंजिरी म्हणाली.

“तेच तर!”

“हे पहा, पण जेव्हा शास्त्रज्ञांना वाटलं असेल की या ठराविक जागेच्या पलीकडे जाऊन काही मिळणार नाही, तेव्हाच ते थांबले असतील ना. काहीतरी मिळणार असेल असं वाटत असताना संशोधन टाकून आता कंटाळा आला असं म्हणत त्यांनी थोडंच खोदायचं सोडलं असेल? आपल्यावरून दुसऱ्याची परीक्षा नेहमीच करू नये मनोबा!” सोन्या म्हणाला. दोघांनाही वाटत होतं, आपण बरोबरच आहोत, तरी दुसऱ्या बाजूला हे म्हणणं पटत नव्हतं.

“एवढं कशाला, हा दुसरा नकाशा बघ,” दुसऱ्या नकाशावरून बोटं फिरवत सोन्यानं म्हटलं, “या नकाशात घरांची आणि रस्त्यांची माहिती सापडेल.”

“पाहू बरं, ममतेचं घर कुठेय याच्यात?”

त्यांनी बस ज्या ज्या रस्त्यांनी गेली होती, तो रस्ता ओळखला. पण मग त्या नकाशात पुढे मात्र सगळं हिरवंच दाखवलं होतं. घराचा मागमूसही नव्हता. तिघांनीही एकमेकांकडे पाहिलं.

“याचा अर्थ एकच, ते घर बांधायच्या आधीच हा नकाशा काढलेला आहे.”

“पण हा नकाशा तर अलीकडचा आहे. शिवाय ते घर खूपच जुनं होतं.” मंजिरीच्या डोळ्यांपुढे ममतेचं घर उभं राहिलं.

या प्रकारात जितकं खोल जाऊ तितकं अडकतच चाललोय आपण. आपण जर त्या पदकाच्या भानगडीत पडलोच नसतो, तर किती बरं झालं असतं! मंजिरीला एकदम शांतता जाणवली. त्यांच्या श्वासाच्या आवाजाशिवाय कसलाच आवाज होत नव्हता. ती बोचरी शांतता संपवण्यासाठी तिघांनीही एकदमच बोलायला सुरुवात केली.

“मग—”

“पण—”

“त्या—” आणि तिघांनाही हसू कोसळलं. ताण कमी झाला होता. तिसऱ्या दालनाकडे त्यांनी आपले पाय वळवले. इथे वेगवेगळी काचेची कपाटं होती. त्यांचे आकारही वेगवेगळे होते. मधूनमधून लावलेल्या दिव्यांमुळे त्यांच्या सावल्या एकमेकांत मिसळत होत्या. लपंडाव खेळायला किती छान जागा! प्रत्येक कपाटात डोकावत ती पुढे पुढे चालली होती.

एका कपाटाशी येऊन मन्या त्यात पाहात पुढे जाणार, तोच थबकला. त्या कपाटावर लिहिलं होतं, ‘ब्रॉंझचा कमरपट्टा.’ “अरे, इकडे या,” असं म्हणून त्यानं दोघांना हाका मारल्या. काही क्षणांतच तिघांनी त्या कपाटाभोवती कोंडाळं केलं. आत छोटे छोटे ब्रॉंझचे नाण्याच्या आकाराचे तुकडे ठेवलेले होते. ते जरी वेगवेगळे होते, तरी एकमेकांत अडकवण्यासाठी त्यांना खाचा ठेवलेल्या दिसत होत्या. मन्याने त्यांच्याकडे निरखून पाहिलं आणि म्हटलं, “मंजिरीजवळच्या तुकड्यासारखंच दिसतंय हे.”

“पण खूपच लहान आहेत.” जिन्याजवळचे आणि खालच्या मजल्यावरचे दिवे डोळे मिटावेत तसे गपकन मालवले गेले.

“संग्रहालय बंद व्हायची वेळ झाली बहुतेक.” सोन्यानं म्हटलं. “आटपा लवकर.”

“तू आणला आहेस तो तुकडा तुझ्याबरोबर?” मन्यानं विचारलं,

मंजिरीनं फ्रॉकच्या खिशात हात घालून तो तुकडा हातात घेतला. पण तो बाहेर काढायचा तिला धीर होत नव्हाता. अनिश्चिततेनं तिनं इकडे तिकडे पाहिलं. शेजारच्या खोल्यांतले दिवेही मालवले जात होते. सोन्यानं घाई करायला सुरुवात केली. खालच्या दाराचा खट्ट असा आवाज आला. मंजिरी वळली. तिला वाटत होतं, धूम ठोकावी इथून. काहीच कटकट नको. पण मन्यानं तिला थांबवलं. तिच्या हातातलं ते पदक काढून घेतलं नि कपाटाच्या काचेजवळ ते नेऊन त्याची कपाटातल्या तुकड्यांशी तुलना करून पाहिली. मंजिरीला सापडलेलं पदक इतर तुकड्यांहून मोठं होतं.

एकदम बोलायला सुरुवात करत सोन्या म्हणाला, “अरे, हे तर या पट्ट्याचं बक्कल आहे.” आता त्यांच्या डोक्यावरच्या गॅलरीतले दिवेही गेले. फक्त ती ज्या जागी उभी होती, त्या हॉलमधले दिवे तेवढे होते.

“आपण त्या व्यवस्थापकाला जाऊन सांगू या,” सोन्यानं म्हटलं. पण एका खटक्याच्या आवाजासरशी त्या खोलीतले दिवेही गेले. कपाटाच्या काचेजवळचं पदक मंजिरीनं काढून पुन्हा आपल्या खिशात घातलं. काही तरी घडत होतं, घडणार होतं. नकळत त्यांच्या मनाला त्याची संवेदना जाणवत होती. जेव्हा तिनं ते पदक बाकीच्या पट्ट्यापासून दूर नेलं, तेव्हा तिला थोडंसं बरं वाटलं.

“आता इथे कुणी यायच्या आत आपण जाऊ या.” सोन्या म्हणाला.

“श्-श्. आवाज नको करू.”

“का नको आवाज करू? उलट आहे, नाही तर इथल्या शिपायाला वाटेल, चोरच शिरलेत.” सोन्या म्हणाला. बाहेरच्या रस्त्यावरील दिव्यांच्या प्रकाशात त्यांनी रस्ता शोधायला सुरुवात केली.

तेवढ्यात कसली तरी हालचाल त्यांना जाणवली. जणू जे होणार असं वाटत होतं, तेच व्हायला सुरुवात झाली होती. मंजिरीच्या छातीत धस्स झालं. तिनं दोघांना थांबवलं. जिन्यावरून एक छाया वर येत होती. वर येताना ती खोली भरून टाकेल असंच वाटत होतं. पावलांचा आवाज येत नव्हता, कपड्यांची सळसळ जाणवत नव्हती. पण उतरते खांदे नि मोठं डोकं वर वर तरंगत यावं तसं दिसत होतं. त्या डोक्यातले डोळे या तिघांकडे रोखून पाहाताहेत असं त्यांना वाटलं.

“तो तोच आहे,” मंजिरीनं पुटपुटत म्हटलं.

“चला, आधी गॅलरीत पळा,” मन्यानं सूत्रं हातात घेत म्हटलं. पण सोन्याची आणि त्यांची चुकामुक झाली होती.

“सोन्या—" मन्यानं हाक मारली.

हाकेच्या दिशेनं येत मन्यानं त्यांना गाठलं आणि जिना चढायला सुरुवात केली. दार उघडल्याचा आवाज आला, तशी ती थबकली. एक डोळा खाली उघडणाऱ्या दाराकडे ठेवत त्यांनी वर चढणं चालू ठेवलं.

ते तिघं जिन्याच्या वरच्या तबकडीत येऊन पोहोचतात, तोच त्यांना दाराचे दोन्ही भाग उघडले गेलेले दिसले. अंधार तर होताच, पण बाहेरच्या रस्त्यावरील दिवा अंधार आणि सावली यातला फरक दाखवत होता. शिवाय त्यांच्या डोळयांना अंधाराची सवय झाली होती. ती रुंद सावली आत दार उघडून दिसेनाशी झाली.

कुत्र्याच्या पुढे मागे धावण्याचा आणि गुरगुरण्याचा आवाज येत होता. क्षण दोन क्षण शांतता पसरली. पाठोपाठ अंगाला टोचावं अशा स्वरात हसण्याचा आवाज आला. तो सगळीकडे दुमदुमत होता. वरच्या कठड्यामागे अंग चोरून बसलेल्या त्या तिघांच्या कानात मधल्या चिरांमधून तो आवाज येऊन पोचला. त्यांनी बोटांनी कान झाकून घेतले तरी त्याचे पडसाद घुमतच होते.

कुत्र्यानं पुढे मागे करत मघापेक्षा जास्त आवाज केला. जमीनीवरच्या जाजमावर नख्या घासत ते धावत होतं. खळ् खळ् आवाजानं त्यांचं लक्ष वेधलं. पुन्हा एकदा हसण्याचा आवाज आला. कुत्र्याचं धावणं बाहेर जाताना कानांना जाणवलं. दार लोटण्याचा आवाजही आला आणि पुन्हा शांतता पसरली.

जिन्याच्या कठड्याला धरून उभं राहण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण पाय जिना उतरू शकतील याची खात्री वाटत नव्हती. मंजिरीनं थरथरत्या हातानं खिशात हात घालून पदक चाचपलं. ते जागेवर आहे, हे पाहून एक उसासा टाकला.

कुणीही काहीही बोललं नाही. बोलण्यानं या शांततेला तडा जाईल नि त्याचा मघाशी फुटलेल्या काचेसारखा आवाज येईल – नको. ती खाली आली. चौकातला दिवा लागला होता. धावत जाऊन शिपाई पोलीसचौकीला फोन करत होता, "लवकर या. चोरानं एक कपाट फोडलं. हो. शिवाय—"

पुढचं ऐकायला न थांबता त्यांनी घाईघाईनं रस्ता सुधारला. काचेच्या कपाटांच्या गर्दीतून वाट काढताना त्यांना त्रास होत होता. मघाशी ज्या कपाटात त्यांनी तो ब्राँझचा पट्टा पाहिला होता त्या कपाटाशी ती येऊन पोचली. त्या कपाटावरचा दिवा लागलेला नव्हता. शेजारच्या दिव्याच्या उजेडात तिथे जमीनीवर पडलेला काचांचा ढीग चकाकत होता. कपाटात सर्व जिथल्या तिथे होतं, फक्त 'ब्राँझचा कमरपट्टा' असं लिहिलेलं होतं ती जागा मात्र रिकामी दिसत होती.

वस्तुसंग्रहालयाच्या खालच्या मजल्यावर ती तिघं आली. पुढच्या खोलीत शिपाई होता.

"चला, काय झालं ते सांगू या त्याला," सोन्या म्हणाला.

"नको, नसती पंचाईत, आपल्यालाच चोर समजायचे." भेदरलेल्या डोळयांनी इकडेतिकडे पाहात मंजिरीनं म्हटलं.

"चला, पळा, त्या दारानं बाहेर पडू या," उजवीकडे असणाऱ्या दाराकडे जात मन्यानं म्हटलं. बाकीची दोघंही त्याच्यामागे गेली. वर दिवा असला तरी जवळच्या मोठ्या झाडांनी जमीनीवर मंडप धरला असल्यानं खाली काहीच दिसत नव्हतं. तशीच वाट काढत, ठेचकाळत ती एका भिंतीशी येऊन पोचली. थोडं पुढे जातात तो एका ठिकाणी ती भिंत पडलेली दिसली. तिच्यावरून पटापटा उड्या मारत ती

रस्त्यावर येऊन पोचली. गार वाऱ्याची झुळुक अंगावरून गेल्यावर त्यांना बरं वाटलं. पिंजऱ्यातून सुटलेल्या पक्ष्याला व्हावा तसा आनंद त्यांना होत होता. मागे वळून पाहिल्यावर त्यांना दिसलं, त्या एवढ्या मोठ्या इमारतीत पुढच्या खोलीत एकटाच असा तो शिपाई दारातून बाहेर टेकडीच्या खालच्या बाजूला पाहात उभा होता. त्या मोठ्याथोरल्या इमारतीची सावली आळसावल्यासारखी पडली होती. रस्त्यावरून एक गाडी सायरन वाजवत वेगानं गेली.

'पोलीस!' यावर कोणीच काही बोललं नाही. ती टेकडीच्या पायथ्याशी येऊन पोचली. निःश्वास सोडत मन्या म्हणाला, "मला वाटत होतं, त्या भूतबंगल्यातून आपण कधी बाहेरच पडणार नाही!" त्यावर मंजिरीनं मान डोलावली.

"काय चमत्कार आहे पहा!"

"कसला चमत्कार?"

"हाच, आपल्याला कळतं काय मंजिरीजवळचं पदक म्हणजे या संग्रहालयातल्या पट्ट्याचं बक्कल आहे म्हणून, आपण वर जातो काय, आणि खाली येऊन पाहातो काय, तर तो पट्टाच गायब!"

"हो ना!"

"म्हणजे याच्यावर तरी आहे तुझा विश्वास!" मंजिरीनं म्हटलं. सोन्यानं फक्त खांदे उडवलेसे केले. मन्यानं पुढे हात करत मंजिरीला म्हटलं, "माझ्याजवळ दे ते पदक."

"नको, मला सापडलंय ते. माझ्याच जवळ राहू दे ते. पण सांगू, मला असं वाटतंय,--"

"काय?"

"मी जर ममतेला हे पदक दाखवलं असतं, किंवा त्या पदकाबद्दल सांगितलं असतं, तर कदाचित हे पुढचं सगळं झालं नसतं."

सोन्यानं हसलंसं केलं.

"हो, तुला सगळीच चेष्टा वाटते. तिच्या शत्रूनं तो पट्टा मिळवलाय आता तो ते बक्कल शोधतोय."

"हे तुला कसं कळलं?" सोन्यानं विचारलं.

"कळलं तसंच. त्याच्याशिवाय तो कुत्रा आपल्या पाठीमागे आला वाटतं!"

"आणि त्या कुत्र्याला कळलं वाटतं, ते बक्कल तुझ्याजवळ आहे ते!"

मंजिरीला कळेना, या माणसासमोर काय बोलावं? याला तर काहीच पटत नाही.

मधे येत मन्यानं म्हटलं, "बाकी हे बक्कल त्या पट्ट्याजवळ नेल्यावर काहीतरी वेगळंच घडतं आहे, असं वाटत होतं."

"हो, तुमची डोकी एकदमच फिरली होती." त्या दोघांच्या मूर्खपणामुळे सोन्याला हसू आवरत नव्हतं.

“तू जर जवळ असतास किंवा तू ते पदक हातात धरलं असतंस तर असं म्हटलं नसतंस,” मन्या म्हणाला.

“असेल बुवा तसंही,” सोन्यानं म्हटलं.

घरं जवळ आली तशी थांबत मन्या म्हणाला, “पण एक मात्र नक्की, आपण उद्या ममतेला भेटायला रानात जायचंच.”

मंजिरीची तयारी होतीच. सोन्याला जरी हा मूर्खपणा वाटत होता, तरी मंजिरी आणि मन्याला सोडावंसं वाटत नव्हतं, म्हणून तो त्यांच्याबरोबर जायला तयार झाला. नेहमीप्रमाणे कोपऱ्यावर निरोप घेऊन ती आपापल्या घराकडे वळली. मंजिरी घरी आल्यावर आईनं म्हटलं, “जेवण तयार आहे, पानंच घे.” तिनं यंत्राप्रमाणे पानं घेतली. आई पाहात होती. अजून पोरीच्या मनातली भीती गेली नाही वाटतं! कशाला त्या रानात ट्रिप नेली कोण जाणे! वरण ढवळत हसलंसं करत आईनं म्हटलं, “आत्ताच ह्यांनी सांगितलं, त्या कुत्र्याचा बंदोबस्त करायला पोलिसात तक्रार दिली आहे.” मंजिरीनं मोठे डोळे करत एकदा आईकडे पाहिलं आणि भात कालवायला सुरुवात केली.

दुसऱ्या दिवशी उजाडायच्या आधीपासूनच धुकं पडलं होतं. शाळांना जरी सुट्ट्या लागल्या होत्या, तरी मोठ्या माणसांची रोजची कामं त्यांना होतीच. बाहेर मुलं हुंदडत होती. रोजच्या सवयीनं मन्यानं लवकर जेवून घेतलं. त्याचे वडील गाडी घेऊन कामावर जायला निघाले. टेबलावरचं मासिक उचलून त्यानं त्यातले विनोद चाळले. तेवढ्यात सोन्या तयार होऊन आलाच. दोघं घराबाहेर पडले. मंजिरी तयार होऊन वाटच पाहात होती. निळ्या फुलांचा कमीज नि पांढरी सलवार तिला छान दिसत होती.

“आई, मी जरा बाहेर जाऊन येते गं,” दार बंद करत तिनं म्हटलं. आई जरा चिडलीच होती. म्हणाली, “जरा अभ्यास कर. काय गृहपाठ दिलाय ते पाहा. नाहीतर बसशील शाळा सुरू व्हायच्या आधी रात्रीचा दिवस करत.”

“पाहू जरा ते पदक.” मन्या म्हणाला.

“हो.” तिनं खिशाकडे हात वळवला. पण कमीजला खिसाच नव्हता. आदल्या दिवशी घातलेल्या फ्रॉकच्या खिशात ते पदक राहिलं होतं. ती रडवेली झाली. “माझ्या लक्षात नाही याला खिसा नाहीये ते. मला वाटलं, नेहमीच्या सवययीनं मी निघताना ते खिशात टाकलं. थांबा, आत्ता जाऊन आणते मी.”

“नको, पुन्हा गेलीस नि नाही पडता आलं बाहेर म्हणजे? होतं ते बऱ्यासाठीच होतं. पदक बरोबर नसलेलंच बरं.” ते पदक बरोबर असलं की संकटं येतात अशी त्याची कल्पना झाली होती.

ती तिघं बसस्टॉपवर गेली तेव्हा बस उभीच होती. समोरासमोरच्या जागांवर बसत त्यांनी कंडक्टरजवळ तिकिटासाटी पैसे पुढे केले. पण त्यांना जाण्याची नक्की जागा कुठे माहिती होती! ती ट्रिपला गेली तेव्हा सर्वांबरोबर स्वतंत्र बसनं गेली होती नि मोकळी जागा दिसली तिथे त्यांनी बस उभी केली होती. कुठे जायचं आहे ते यांना सांगता येत नाही हे पाहून कंडक्टर चिडला. “काय शाळेत जाणारी पोरं! कुठे जायचं आहे तेही माहीत नाही!” बाहेर वाकत तंबाखूची पिंक टाकीत त्यानं दुसऱ्या लोकांकडे पाहात विजयी मुद्रेनं हास्य केलं.

“असं करा, आम्हाला वाटतं, आमची जागा आली की आम्ही उतरू. तेथे आम्हाला तिकिटं द्या. आम्ही काही फुकट प्रवास करणार नाही.” सोन्यानं सांगितलं.

“तुम्ही ढीग कराल फुकट प्रवास, पण मी करू द्यायला हवा नं!” कंडक्टरनं शेरेबाजी केली. यावर मागची दोनचार माणसं हसली. घंटेची दोरी ओढत त्यानं ड्रायव्हरला म्हटलं, “चला, सुरू होऊ द्या गाडा.” आपल्या विनोदावर खूष होत हसत त्यानं आपल्या जागेवर बसकण मारली. गाडी सुरू झाली. ती तिघं बाहेर लक्ष ठेवून होती. एकेक ओळखीच्या खुणा मागे जात होत्या. गावाची हद्द संपली. झाडी सुरू झाली. मन्यानं म्हटलं, “आली वाटतं ती जागा.”

“छे रे, तिथे असं इतकं रिकामं मैदान कुठे होतं?” गाडी पुढे चालली.

“आली आली ती जागा,”

“अंहं- तिथे असा बांध कुठे होता? आपण त्या छोट्याशा जागेत तर गाडी थांबवली होती.” त्यांची चर्चा चालूच राहिली.

ती जागा अजून येतच नव्हती. त्या दोघांनी मंजिरीकडे पाहिलं. खरं तर ती एखादी जागा शोधायची म्हटलं तर नेहमी गोंधळायची, पण आज ती शांतपणे बाहेर बघत बसली होती. मागचं सर्व तिला आठवत होतं. तिनं बाहेर शेतांकडे पाहिलं. शेतं मागे पळत होती. पण कुत्र्याचा किंवा त्याच्या मालकाचा कुठे मागमूसही नव्हता. बाहेर बघता बघता त्यांना जिथे त्यांची बस ट्रिपच्या वेळी थांबवली होती ती जागा दिसली. ती उठून उभी राहिली. कंडक्टरनं बस थांबवली. “इथं कोणीही राहात नाही,” तो म्हणाला. काय वेडी पोरं आहेत असा भाव त्याच्या चेहऱ्यावर होता.

“हो, पण आम्हाला इथेच उतरायचंय,” सोन्या शांतपणे म्हणाला.

“उतरा, आपलं काय?” कंडक्टरनं तिकिटं देत पैसे पिशवीत टाकले नि ती तिघं उतरल्यावर घंटा वाजवली. काही मिनिटांतच बस वळणावर दिसेनाशी झाली. आजूबाजूला झाडी होती. थंडीमुळे ऊन जाणवत नव्हतं. गावातलं धुकं जरी नाहीसं झालं असलं, तरी इथे चांगलंच दाट वाटत होतं. पाच पंचवीस पावलांवरचं काहीही दिसत नव्हतं.

“बरोबर आलो नं आपण?” मन्यानं विचारलं.

“हो.”

“अगदी बरोबर आलो या धुक्यात धडपडायला. उद्या वर्तमानपत्रात बातमी येईल, ‘धुक्यात सापडलेले तिघं.’” म्हणून सोन्यानं शेरा मारला.

***********

# पराक्रमी त्रिकूट -४

## जंगलातील रानमानव

ट्रिपच्या वेळी जिथे त्यांनी बस थांबवली होती, तिथे ती येऊन पोहोचली.

"आता त्या हरितमानवाच्या हाताकडे घेऊन चल आम्हाला," मन्या मंजिरीला म्हणाला. मंजिरीनं मान हलवली. या मन्याला सगळ्याच गोष्टींचा उत्साह. तिनं इकडेतिकडे मान फिरवून पाहिलं. समोर नि आसपास झाडं दिसत होती. त्यांच्या पलीकडे दाट धुक्याचं रान उभं होतं.

"चला," मंजिरीनं वाट दाखवायला सुरुवात केली. उंच उंच झाडांतून मधेमधे रानटी प्राण्यांनी पायवाट तयार केली होती, तिथलं गवत भुईसपाट झालं होतं. त्या पायवाटेनं ती पुढे निघाली. एक दोन वळणांनंतर ती हरितमानवाच्या हाताजवळ येऊन उभी राहिली. हिरव्या गवताचे उंचवटे समोर पसरले होते. त्यांच्यावरून नजर फिरवली की खरंच बोटांची आठवण होत होती. मन्या त्या उंचवट्यावर चढला. त्यानं इकडे तिकडे पाहात मंजिरी आणि सोन्याला म्हटलं, "इकडे या." पण मंजिरीची त्या हरितमानवाच्या बोटांजवळसुद्धा जाण्याची हिंमत होत नव्हती. तिनं उलट सोन्यालाच म्हटलं, "सोन्या, पुढे जाऊ नकोस हं. मन्या, मागे फीर."

पण हे ऐकायला सोन्या थांबला होता कुठे? तो त्या उंचवट्यावर चढून पुढे पुढे चालला होता.

"थांबा," मंजिरी एकदम ओरडली. उजवीकडे काहीतरी सळसळलं. भीतीनं तिच्या तोंडाला कोरड पडली. तिचं ओरडणं ऐकून सोन्या आणि मन्या धावत तिच्या जवळ आले नि ती बघत असलेल्या दिशेला त्यांनी पाहिलं. मिनीटभर नीट लक्ष देऊन पाहिल्यावर त्यांना दिसलं, झुडपं सळसळत होती.

"बघ, काही नाही, तू उगीचच घाबरतेस. तू इथेच थांब तुला भीती वाटत असेल तर. पण उगीच ओरडू नकोस." सोन्यानं म्हटलं आणि तो पूर्वीच्या जागी जाऊन निरीक्षण करायला लागला.

"हे पाहा मनगट," मन्या ओरडला.

"मनगट?" मंजिरीनं आश्चर्यानं विचारलं.

"हो, इथे चक्क मनगटासारखा आकार दिसतोय. तुला नाही दिसला तेव्हा?"

"नाही,"

"इकडे येऊन बघ."

तिची पुढे जायची हिंमत होत नव्हती.त्यांनीच परत यावं असं तिला वाटत होतं.

"खूप वर्षांपूर्वीपासूनचं वाटतं गं हे. दाट गवत उगवलंय इथे." तो म्हणाला.

"शिवाय ही झाडं – नाही, ही झाडं बोटांच्या मधल्या जागेत दाटीवाटीनं आली आहेत." कमरेइतक्या उंच बांधावरून त्यानं खाली उडी मारली.

“अरे, काय झालं?”

मंजिरीचा चेहरा कसानुसा झाला होता.

“अरे, मी पाहिलं तेव्हा हे इतकं उंच नव्हतं. फक्त गुडघ्याइतकं उंच होतं. शप्पथ.” गळ्यावर हात ठेवत ती म्हणाली.

आता जास्त बोलण्यात काही अर्थ नाही असं पाहून तो म्हणाला, “आता आधी ममतेला भेटू आपण. खरंच, तो मनगटापुढचा भाग हातासारखा वाटतो, नाही?”

तिनं मान उंचावून पाहिलं खरंच की. ते अगदी हातच वाटत होता. “तो हात आधी इथे नव्हता,” ती कसंबसं पुटपुटली.

“सोन्या कुठाय?”

तो पलीकडच्या बांधावरच होता. “वेडी आहात झालं. काही नाही, इथे काहीतरी कबरस्तानासारखं असावं. किती जुनं दिसतंय हे सगळं! हे असं काय एका रात्रीत तयार होतं का?” सोन्या म्हणाला.

“बरं बरं, पण आधी आपण ममताकडे जाऊया.” असं म्हणत ते तिघं निघाले.

मंजिरी पुढे चालली होती. तिच्यामागून सोन्या आणि मन्या चालले होते. तिला जणू ती वाट माहिती आहे, रस्ता आपल्या पायाखालचा आहे अशा आत्मविश्वासानं ती चालली होती. सोन्या मध्येच मागे वळून पाहात होता.

“काय आहे रे?” मन्यानं विचारलं.

“काही नाही,” सोन्यानं मान फिरवून उत्तर दिलं. आणखी विचारलं तरी ते काही उत्तर द्यायचा नाही म्हणून मन्यानंही काही विचारलं नाही. त्यांचा पुढचा प्रवास सुरू झाला. आता रानाची दाट झाडी भिंतीसारखी उभी राहिलेली दिसत होती. तिथे मंजिरीनं म्हटलं, “आता थांबू या जरा. किती भरभर चालतोय आपण!” ती थांबली. क्षणभर गेला असेल नसेल, मंजिरीनं मागे पाहात किंकाळी कशीबशी आवरली. मागे धुक्यात अस्पष्ट असा आवाज ऐकू आला. काहीतरी त्यांच्या दिशेनं येत होतं.

त्यांना कळेना, काय करावं. काय येतं आहे हे पाहायला ती नकळत मागे वळली. सावकाश पावलं टाकत मागे जाऊ लागली. “कोण आहे?”, “कोण आहे?” मन्यानं विचारलं. तो थांबला. त्याच्या हसण्याचा आवाज आला, तसं इतरांनी समोरची नजर काढून त्याच्याकडे पाहिलं.

“हं, लाकडाचा बुंधा आहे, बुंधा,”

पुन्हा वळून त्यांनी ममतेच्या घराकडे जायला सुरुवात केली. मागे सळसळ ऐकू येत होती. असेल कोणी जनावर!

“किती भीती वाटली मला मगाशी!” मंजिरी म्हणाली. ती पुढे चालत होती. मन्या तिच्याबरोबरच होता. सोन्या जरा मागून चालला होता. त्याला मात्र काहीतरी वेगळं वाटत होतं. आपल्याला काय वाटतंय हे आपण या दोघांना सांगितलं तर ती किती घाबरतील या कल्पनेनं त्याला हसू आलं.

डावी उजवीकडे पाहात तो चालला होता. त्याला पलीकडच्या झाडाजवळ हालचाल वाटली म्हणून त्यानं वळून पाहिलं. झाड हलत होतं. पुढे चालत त्यानं पुन्हा पाहिलं, तर तसंच दुसरं झाडही हलत होतं. शास्त्राच्या तासाची त्याला आठवण आली. सरांनी उदाहरण दिलं होतं, गाडी चालली की स्थिर शेतं चालताहेत असं वाटतं. तो थांबला. त्यानं स्वतःला चिमटा काढून पाहिला. तो चांगला जागा होता. तो जरी उभा राहिला, तरी झाड हलतच होतं. त्यानं डोळे फाडून पाहिलं. ते झाडच नव्हतं. एक मनुष्याकृती दिसत होती.

मंजिरी आणि मन्या थोडेच पुढे होते. सोन्यानं त्यांना हाक मारून सावध करण्यासाठी तोंड उघडलं, पण तोंडातून शब्दच बाहेर पडेना. तो जीव घेऊन पळतच सुटला आणि मन्याच्या अंगावर जवळजवळ जाऊन आदळलाच. त्यानं मागे हातानं खूण केली.

तो माणूस आता उघडउघड रस्त्यावर येऊन उभा होता. लपून राहण्याचा प्रयत्नही करत नव्हता. तो त्यांना पाहून थांबला. कसला तरी कर्कश आवाज त्यानं काढला. दोनचार झाडांपलीकडून आणखी एक तसाच माणूस बाहेर आला. ते दोघंही उंच होते. झाडांमध्ये झाडांसारख्या दिसणाऱ्या त्यांच्या आकृत्या भयाण दिसत होत्या. एखाद्या चित्राप्रमाणे ते दोघंही स्तब्ध उभे राहिले.

मंजिरी आणि मन्या, सोन्यानं पुढे चालायला सुरुवात केली. त्यांच्या चालण्याचं रूपांतर पळण्यात कधी झालं, ते त्यांचं त्यांनाही कळलं नाही. मंजिरीला स्वप्नात असल्यासारखं वाटत होतं. जणू मागच्याच घटना पुन्हा घडत होत्या. ती जणू सरावानंच ममतेच्या घराच्या दिशेनं पळत होती. पण मन्या आणि सोन्याला हे नवं होतं. ते गोंधळून गेले होते. कसलाही विचार न करता ते दोघं मंजिरीच्या मागून धावत निघाले.

पळता पळता त्यांनी मान फिरवून पाहिलं. मगाशी पाहिलेल्या दोघांच्या जागी आता तसल्या माणसांचं सैन्यच उभं राहिलं होतं. झाडा झाडामागून एक एक माणूस बाहेर येत होता. त्यांचा पाठलाग जोरानं चालू होता. काही माणसं मागून धावत होती. काही डावीकडून, काही उजवीकडून. काहींनी तर त्यांच्याही पुढे मजल मारली होती.

"ए, आपण रस्त्याकडे जाऊ या," सोन्या पुटपुटला.

"नको, ती आपल्याला हरवायच्या विचारात दिसताहेत," मन्या म्हणाला. आता तपकिरी रंगाची ममतेच्या घराची भिंत दिसायला लागली होती. ही तिघं त्या घरापर्यंत जाण्याआधीच त्यांना अडवण्याचा त्या माणसांचा विचार स्पष्टच दिसत होता. सावकाश ते पुढे येऊन थांबले. ममतेचं घर आणि या त्रिकुटाच्यामध्ये भिंतासारखे उभे राहिले. ते निश्चल होते. ही मुलं आता काय करतात, याचीच वाट पाहात होते.

तिघंही थांबली. चक्रव्यूहात अडकावं तशी त्यांची स्थिती झाली.

"ममता—" मंजिरीनं हाक मारण्याचा प्रयत्न केला. पण तिचा आवाज इतका क्षीण येत होता, की मन्या अन् सोन्याखेरीज इतर तिसऱ्या माणसालाही तो ऐकू गेला नसता. मग त्या घरातल्या ममताला कुठून ऐकू जाणार! शिवाय त्या माणसांनी आता कर्कश आवाज काढायला सुरुवात केली होती. एकामागून

एक असे ते त्या ओरड्यात सहभागी होत होते. सगळं रान त्या आवाजानं भरून गेलं होतं. मंजिरीला वाटलं, आपल्या कानाचे पडदे फाटतात की काय!

पण त्यांनी मागे मागे जायला सुरुवात केली होती.

आता ममतेचं घर धुक्याच्या पडद्याआड दिसेनासं झालं होतं.

ते मागे जात होते. पण तेव्हाही त्यांचा आवाज असह्य वाटत होता.

कसा कोण जाणे, पण मन्या थांबला. आता ही लढाई हरलो, तर सगळंच हरू, त्याच्या मनात विचार आला. मनाची तयारी करत, कानावर हात ठेवत तो पुढे सरकला. हळूहळू पळायलाही लागला. सोन्या आणि मंजिरी अवाक् होऊन काय होतंय हे पाहात राहिली. त्या माणसांनाही काहीतरी जाणवलं. भोंग्याचा आवाज कमी व्हावा तसा त्यांचा आवाज हळूहळू कमी होत गेला. मन्या त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिला.

तो कर्कश आवाज आता जवळजवळ बंदच होत आला होता. त्यानं समोर पाहिलं. पायातली शक्तीच कुणी काढून घ्यावी तसा तो उभा राहिला. समोर उभे प्राणी- त्यांना माणसं म्हणावं की काय म्हणावं ते त्याला कळेना. हात, पाय, शरीर सगळं माणसासारखंच होतं; पण कातडं- छे! जनावरांच्या कातड्यासारखी त्यांची त्वचा दिसत होती. चेहरा, डोकं त्यानंच झाकलं होतं. हाडावर ताणून बसवावं तसं ते कातडं डोक्यावर दिसत होतं. तोंड, डोकं, नाक कशाचाच पत्ता नव्हता. पण तरी ते डोळे फाडून बघताहेत, त्यांना आरपार दिसतंय असं वाटत होतं. नसलेल्या नाकानं वास घेत ते मागावर येत होते. नसलेल्या तोंडानं ते तो भयंकर आवाज करत होते.

सोन्या आणि मंजिरीही मन्याच्या मागे येऊन पोहोचली. मन्यानं हातात संरक्षणासाठी घेतलेली काठी त्याच्या हातातून गळून पडली होती. असल्या या प्राण्यांपुढे काय करावं हे त्यांना कळेना. त्यांच्या गुरगुराटापुढे आपला फार वेळ टिकाव लागेल असंही त्यांना वाटेना. शेवटी त्यांच्याकडे पाठ फिरवून 'राम राम' असा जप करत त्यांनी पळायला सुरुवात केली. मागून पळण्याचा आणि ओरडण्याचा आवाज पुन्हा येऊ लागला होता. झाडांतून वाट काढत धुक्यातून वाट काढायची होती. पण त्या रानमानवांना त्याची काहीच तमा वाटत नव्हती. वाढत्या वेगानं ते पुन्हा एकदा या तिघांच्या मागे लागले होते.

आता मात्र एक वेगळाच आवाज ऐकू आला. तो हळूहळू ऐकू आला आणि नाहीसाही झाला. रानमानवांचा ओरडाही त्या पाठोपाठ थांबला.

मन्यानं धीर करून मागे वळून पाहिलं. त्या रानमानवांचा मागमूसही कुठे दिसत नव्हता. त्याचा त्याच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. तो थांबला. समोर आणखी एक आकृती उभी होती. ते पाहून त्याच्या छातीतले ठोके वेगानं पडू लागले होते. त्याचे पाय पळण्याच्या तयारीत होते. पण त्या समोरच्या बाईनं त्याला हात धरून थांबवलं. "इकडे ये बाळ," शांत आवाजात ती म्हणाली. इतर दोघं पुढे गेले होते. तो त्या बाईकडे वळला. तिचा चेहरा तिच्या आवाजाइतकाच शांत होता. तिच्या हातातल्या अंगठ्या चमकत होत्या.

“ममता!” तो उद्‌गारला.

“हो, मीच ममता. आता तुम्ही घाबरण्याचं काहीही कारण नाही. त्यांना मी हकलून दिलं आहे,” ती म्हणाली.

“हो, समजलं.” तो तिच्याजवळ जाऊन उभा राहिला. तिनं त्याच्या पाठीवरून हात फिरवला. आता त्याच्याजवळ येऊन उभ्या राहिलेल्या सोन्या आणि मंजिरीकडे तशाच स्निग्ध नजरेनं पाहात तिनं त्यांच्याही पाठीवरून हात फिरवला. त्यांच्या मनातली भीती आता कुठच्याकुठे पळाली.

************

# पराक्रमी त्रिकूट- ५

## मंजिरी !

मंजिरीनं मान वर करून प्रश्नार्थक नजरेनं ममतेकडे पाहिलं. “हा तुझा मित्र आहे हे माहिती आहे, पण हा कोण?” ममता सोन्याबद्दल विचारत होती.

“हाही माझा मित्र आहे. सोन्या. पण हा मन्या काय माहिती तुला? तू कधी त्याला पाहिलंस?” मंजिरीनं विचारलं.

“एका वेळी एकच प्रश्न,” ममतेनं तिचं बोट त्यांच्यापुढे नाचवत म्हटलं. त्या बोटातली निळी अंगठी लख्खकन चमकली. “परवा तुझ्या मागोमाग आलेल्या टोळीत हा होता.” तिनं स्पष्टीकरण दिलं. “चला, आता आपण आधी घरी जाऊ या.”

ती तिघं घराच्या वाटेनं निघाली. जाता जाता ममतेनं विचारलं, “तुम्ही आत्ता काय पाहिलंत?” तिची नजर सोन्याकडे होती. तिची नजर टाळत सोन्या म्हणाला, “दोन माणसं.”

“आणि मन्या तू?”

“म- माणसं नाही—”

“माणसं नाही तर काय?”

“ती उंच होती, माणसांसारखीच होती. त्यांचे कपडे का काय होतं कोण जाणे! पण ते जनावरांच्या कातड्यासारखं दिसत होतं. ते भयानक आवाज काढत होते. एखादा मुखवटा घालावा तसे त्यांचे चेहरे दिसत होते.” त्यांना नाक, कान, डोळे नव्हते असं आपण सांगितलं तर कुणाला ते खरंच नाही वाटायचं, म्हणून त्यानं आपली मुखवट्याची कल्पनाच सांगितली.

“तू पाहिलंस नीट?”

“हो तर!” ममतेच्या डोळ्यात शंका होती. ही दोघं एक म्हणताहेत आणि मन्या मात्र दुसरंच सांगतोय.

“मी त्यांच्या जवळ जाऊन पाहिलं.” मन्या म्हणाला.

रानातल्या इतर रस्त्यांपेक्षा ते जात होते तो रस्ता बराच चांगला होता, सोन्याचं निरीक्षण चाललं होतं. तो सर्वात मागून चालला होता. ममताच्या घरात जावं की नाही याबद्दल त्याचा निर्णय होत नव्हता. पण ते टाळणं जवळजवळ अशक्यच होतं. अजून धुकं दाटच होतं. पण ती तिघं जशी त्या घराच्या तटबंदीच्या आत गेली, तसा धुक्याचा मागमूसही दिसेना. या भयाण रानात ही बाई एकटीच राहाते? तिला भीती नाही वाटत? निळ्या मखमलीच्या चपला घालून ती हिंडत होती- अशा मातीवर! अशा काट्याकुट्यात!! आणि त्या चपला कुठे तुटल्या होत्या, त्यामुळे? छे!

घराच्या ओट्यावर ती येऊन पोहोचली. दोन दिवसांपूर्वी मंजिरी अशीच आली होती. तिला हे घर नवखं वाटत नव्हतं. सोन्या आणि मन्यालाच या वातावरणात सगळं नवीन दिसत होतं.

“हा काय प्रकार चाललाय, मला काहीच कळत नाहीये.” सोन्यानं म्हटलं.

“हो, सांगते ना. पण आधी आत या.” ममता म्हणाली.

ती आतल्या दिवाणखान्यात गेली. चार खुर्च्यांशिवाय तो जवळजवळ रिकामाच दिसत होता. दिवाणखान्याला खूप दारं होती. मध्ये एका टेबलावर एक भांडं आणि चार ग्लास ठेवलेले होते.

“बसा,”

सगळी बसली. “आधी आपण मधुर रस पिऊया. रस ओत मंजिरी त्या ग्लासात.” ममता म्हणाली.

मंजिरीनं त्या भांड्याकडे पाहिलं. त्याच्यावरचं झाकण टेबलावर काढून ठेवलेलं होतं. पण आत तर काहीच दिसत नव्हतं. “आत काहीही नाहीये,” मंजिरी म्हणाली.

“आहे तर! नीट बघ.” ममता स्मितहास्य करत म्हणाली.

मंजिरीनं उठून टेबलाकडे जाऊन त्या भांड्यात पाहिलं. पण तरीही तिला आता काहीच दिसेना. आता आपण पुन्हा तेच म्हटलं, तर आपला वेडेपणा दिसेल म्हणून तिनं ते भांडं उचललं. ते जड लागत होतं. ते तिनं शेजारच्या ग्लासात तिरकं केलं. आतून निळसर लाल रंगाचा रस ओतला जात होता. प्रत्येकानं एकएक ग्लास उचलला. तो प्यायला सुरुवात केली. तो कसल्यातरी फळाचा रस असावा. गोड होता. त्याला मधुर रस नाव शोभत होतं. सोन्याला मात्र आता आणखीच बेचैन वाटायला लागलं होतं. या प्रकारात काहीतरी नक्कीच काळंबेरं आहे! त्याला वाचलेलं आठवलं, रानात चेटकिणी असतात. हा विचार मनात आल्याबरोबर तो त्यानं झटकून टाकला. छे! चेटकिणी वगैरे सगळ्या कल्पना आहेत, त्यानं स्वतःला समजावलं. पण त्याच्या मनाचा निर्णय होईना. त्यानं ग्लासाच्या कडेला ओठ लावले नि ग्लास बाजूला केला. पेयाचा घुटका घ्यावा तसा आवंढा गिळला. बघणाऱ्याला वाटावं, तो पितोच आहे!

पण ममतेच्या नजरेतून हे सुटलं नाही. तिनं त्याच्याकडे पाहिलं, स्मित केलं. बोलली मात्र काहीच नाही. “काय प्रकार चाललाय हा?” सोन्यानं पुन्हा विचारलं. पापण्या हळूहळू वर उचलत ममतानं त्याच्याकडे पाहिलं. तो खिडकीबाहेरच्या झाडाकडे पाहात होता. “ह्याला काही पटणार नाही मी काय सांगणार आहे ते.” ममता म्हणाली.

सोन्यानं क्षणभर ममतेकडे पाहिलं आणि पुन्हा झाडाकडे नजर लावली. ममताकडे सतत पाहिलं तर तिच्या नजरेची जादू आपल्यावरही होईल अशी भीती त्याला वाटत होती. मन्या आणि मंजिरी तर तिच्याच हातात गेल्यासारखे वागत आहेत. म्हणून आपण तिच्या नजरेकडे बघता कामा नये असा विचार त्यानं केला.

“सुसंगत गोष्टी करण्यातच जादू असते.” ममता बोलत होती. तिनं सोन्याकडे पाहिलं आणि म्हटलं, “बरं बाबा. सुसंगत गोष्टी करण्यातच शास्त्र असतं. आता तर झालं?”

सोन्याला नकळत हसू आलं. आपल्या मनातला अविश्वास तिला कसा कळतो कोण जाणे!

“खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. हा भाग तेव्हा अवर्णनगर म्हणून ओळखला जायचा. जिकडेतिकडे सुखसमृद्धी होती. खायला प्यायला खूप होतं. सगळे सुखी होते. पण दैवाला हे पाहावलं नाही. समुद्रमार्गानं एक माणूस आला. त्याच्याबरोबर तलवारी, भाले घेतलेले सरदार, सैनिक होते. त्यांनी इथल्या सगळ्या शांततेचा भंग केला. सुखसमृद्धी नाहीशी केली. खूप मोठी लढाई झाली. त्या लढायांचे परिणाम आपण भोगत आहोत.”

ममतेनं हात वर केला. बाहेरच्या उन्हाच्या कवडशात तिच्या हातातल्या अंगठ्या चमकल्या. सोन्यानं तिच्या हातावरची नजर पटकन काढून घेतली. न जाणो, त्यात काही जादूबिदू असायची. “ते सरदार म्हणजे आम्ही होतो की काय गेल्या जन्मी?” सोन्यानं शंका काढली.

“पुढे ऐका काय झालं ते.” ममता पुढे सांगू लागली, “तो राजा फार दुष्ट होता. त्याचे सरदार तर त्याच्याहूनही दुष्ट होते. त्यानं समुद्रकिनाऱ्यापासून गावं जिंकायला सुरुवात केली. एक गाव जिंकलं की दुसरं. गाव जिंकलं की घरादारांची राखरांगोळी करायचे ते. काही वर्षांनी अशा गावांत रान वाढायला लागायचं. ते ज्या होडीनं या भागात आले, ती होडी ते आपल्याबरोबर ओढत न्यायचे.”

त्या होडीचंही वर्णन तिनं केलं. काळीभोर अशी ती होडी होती. तिच्या टोकाला एका राक्षसाचं डोकं काढलेलं होतं. त्या राक्षसानं जीभ बाहेर काढलेली होती. त्या लाललाल जिभेतून जणू निखारेच आग ओकताहेत असं वाटायचं. ती जसजसं एक एक सांगत होती, तसे तिच्या चेहऱ्यावरचे भावही बदलत होते. ती कधी गंभीर होत होती, तर कधी रागीट. कधीकधी उदासही दिसत होती. कधीकधी तिचे डोळे आत्मविश्वासानं चमकायचे.

“काहीवेळा माझी शक्ती फार अपुरी वाटते मला,” ममतेनं आकाशाकडे पाहात एक उसासा टाकला. त्या लढाऊ वीरांशी या ममतेचा काय संबंध? मंजिरीच्या मनात प्रश्न उभा राहिला. पण तिनं ममता काय सांगते ते ऐकायचं ठरवलं. संध्याकाळ होत होती. गारवा वाढत होता. खिडकीतून एक वाऱ्याची झुळुक आली, तसा मन्याच्या अंगावर थंडीनं काटा उभा राहिला. घरी लवकर जायला हवं. पण आता इथे बसल्यावर हलणं त्याच्या हातात मुळीच राहिलं नव्हतं. सोन्यानं इतर दोघांकडे पाहिलं. त्यांच्यावर ममतेच्या बोलण्याचा चांगलाच परिणाम झालेला दिसतोय. निदान आपण तरी तिच्या जादूच्या बाहेर राहायला हवं. निदान एकाचं तरी डोकं ठिकाणावर राहायला हवं, असा विचार त्यानं केला. झाडावरच्या एका घरट्यात पिलं चिवचिवाट करत होती. त्यांचे आवाज मोजायला त्यानं सुरुवात केली.

ममता सांगतच होती. तो लढाऊ वीर आणि त्याचे सरदार नवीन नवीन भाग जिंकत, बरोबरची ती भयाण होडी आपल्याबरोबर ओढत मार्ग आक्रमत होते. त्यांच्या पराक्रमाला ओहोटी अशी काय ती माहीतच नव्हती. जो कोणी त्यांना प्रतिकार करायला येईल, त्याचा पराभव हा ठरलेलाच होता.

“एकदा काय झालं, या गावापलीकडच्या रानात ते आले.—तेव्हा इथे सुंदर गाव होतं. तिथे त्यांची एका बलाढ्य सेनेशी गाठ पडली. त्या लढाऊ वीराची- त्या समशेरबहाद्दराची सेना होती त्याच्या पाचपट सेनेनं त्यांचा या गावाला यायचा मार्ग अडवला. त्यांना वाटलं, समशेरबहाद्दर शरण येईल. पण तसं झालं नाही. घनघोर लढाई झाली. दोन्ही बाजूंनी लढण्याची शर्थ केली. समशेरबहाद्दरानं त्याच्या पाचपट असलेल्या सेनेचा अक्षरशः धुव्वा उडवला. त्याचा त्याला गर्व झाला. त्यामुळे तो जास्तच उग्र आणि

दुष्ट बनून पुढे पुढे यायला लागला. आता काही तरी करणं करणं भागच झालं. मी खूप विचार केला. माझी सर्व शक्ती या प्रत्नात गुंतवली तेव्हा मला या सगळयाचं रहस्य उलगडलं."

ममता थांबली. तिच्या डोळयासमोर जणू ते रहस्य उलगडताना दिसत होतं. तिचे डोळे ते पाहात होते. "काय होतं त्या सर्वाचं कारण?" मंजिरीनं न राहवून विचारलं. ममता भानावर आली. तिनं सांगितलं, "पट्टा. धातूचा कमरेचा पट्टा. तो पट्टा त्या समशेरबहाद्दरच्या कमरेला रात्रंदिवस असायचा."

"पट्टा, धातूचा पट्टा?" मन्यानं मंजिरीकडे पाहिलं. न बोलता त्यांना त्या वाक्याचा अर्थ समजला होता. त्याची समज डोळयात दिसत होती.

"तो पट्टा या विजयाला कारण होता. तो जादूचा पट्टा होता. त्याला मध्ये एक पदक होतं. त्याच्यावर एका योद्ध्याची आकृती होती ती आकृती जेव्हा सुलटी असेल, तेव्हा तो तो पट्टा घालणाऱ्याला कशाचीही भीती नाही असा वर मिळालेला होता. अर्थात समशेरबहद्दर ते पदक नेहमी सुलटंच राहील अशी खबरदारी घ्यायचा. नाही तर हे असं कधीच झालं नसतं. मी अशी अपयशी ठरले नसते. माझं त्या दिवशी चुकलं नसतं तर!" ती हातवारे करत शेवटची वाक्यं स्वतःशीच बोलावीत त्याप्रमाणे बोलत होती. खोलीत शांतता होती. हाताला एक झटका देऊन तिनं हात खाली आणला. एक दोन करत बोटं मोजली, मान वर केली अस्पष्ट असं स्मित तिच्या तोंडावर विलसत होतं.

"किती वर्षांपूर्वी झालं हे सगळं! अखेर समशेरबहाद्दर तुम्ही जिथे परवा गेलात तिथे आला. त्या दिवशी निसर्गाला जणू कशाचा तरी सुगावा लागला होता. वारा वाहात नव्हता, पानं हलत नव्हती. आवाज होत नव्हता. पक्षी आपापल्या घरट्यांत बसून होते. आता स्वस्थ बसायचं नाही, काही तरी पाऊल टाकायचं असं मी ठरवलं. आता लढाई शस्त्रांची नव्हती. त्या शूरांच्या शौर्याची आता कसोटी होती. मी माझी शक्ती तिथे पाठवली. अदृश्यपणे सामना चालला होता. तो मागे सरत नव्हता. मी तर मागे सरणारच नव्हते. मला जगाला वाचवायचं होतं. आता तो जिंकला, तर जगाचं मरण समोर दिसत होतं. असं घडता कामा नये, असं होता कामा नये. मी त्या पट्ट्याला हात घातला. त्यानंही निकरानं प्रतिकार केला. निसर्ग क्षणभर थांबला. –काय होतंय ते पाहायला. या सगळया प्रकारात त्या पट्ट्यापासून ते पदक वेगळं झालं आणि तो पट्टा नाहीसा झाला त्या राजाबरोबरच. त्यानं आपल्या सरदारांना घेऊन दूर दूर असलेल्या टेकड्यांवर राज्य थाटलं. तिथे राहणारे लोक पळून गेले. कंटाळून त्यानं तिथल्या टेकड्यांवर माणसाची आकृती खोदली, आपली शक्ती त्याच्यात घातली आणि शहरांत बांधलेल्या मोठ्या राजवाड्यात तो राहायला गेला."

"कुठे होता तो राजवाडा? म्हणजे कुठल्या गावात? आमच्याच? आणि पुढे काय झालं?" मन्यानं अधीरपणानं विचारलं. पुढे काय झालं हे कळायची उत्सुकता तर होतीच; शिवाय ते कळल्यावर त्यांना जाणवलेल्या आणि त्यांनी पाहिलेल्या गोष्टीचा उलगडाही होणार होता. त्याच्यासमोर गाव उभं राहिलं.कुठे होता राजवाडा? राजवाडा वाटावा अशी इमारत तर त्याला पाहिल्याचं आठवेना. मग तो टेकडीवरचा भुताचा वाडा- तो तर नसेल त्याचा राजवाडा? का टेकडीच्या पायथ्याशी आता पाडताहेत त्या मोठ्या मोठ्या दोन इमारती म्हणजे त्याचा राजवाडा होता?

"मधे बरेच दिवस गेले. एकदा मोठं वादळ झालं. त्या टेकडीजवळ मोठा भूकंप झाला. त्या हरितमानवानं- त्या दगडात खोदलेल्या आकृतीनं स्वतःला सोडवून घेतलं आणि तो या रानात पुन्हा

आला. त्याच्या रूपानं पुन्हा समशेरबहाद्दर माझ्याशी लढायला आला. पण आता मलाही त्याचं गुपित माहिती झालं होतं. त्यानं ते निसटलेलं पदक नीट बसवलं नव्हतं. पुन्हा पट्ट्याशी लढाई झाली. तो पट्टा निसटून पडला आणि निखळला. पदक आणि पट्टा वेगळे होऊन कुठे पडले कोण जाणे. समशेरबहाद्दर हतबल होऊन पळून गेला. पण आता त्या पट्ट्यात माझी शक्ती अडकली आहे. त्यामुळे मला काहीच करता येत नाही. नाही तर माझी सगळी शक्ती नाहीशी होईल. माझ्या त्या शक्तीशी त्या योद्ध्याच्या क्रूर शक्तीची लढाई आजही चालू आहे."

ममतानं तिची कहाणी संपवली तरी तिचा प्रभाव अजून तसाच होता. काही वेळानं भानावर येऊन सोन्यानं मन्याला विचारलं, "अरे, मंजिरी आणि ममता कुठे गेल्या? आता तर इथेच होत्या!"

"आत्ताच येतो म्हणून सांगून नाही का गेल्या त्या?" मन्यानं म्हटलं. ममतेचा प्रभाव चुकवायला जाताना तिचा पगडा तुझ्यावर जास्त पडला, मन्याच्या मनात विचार आला.

त्या दोघी परतल्या. मंजिरीच्या हातात एक पिशवी होती. ममतेनं मंजिरीच्या डोक्यावर हात ठेवला. तो काढून घेत न बोलता तिला घेऊन ती खोलीबाहेर पडली. मन्या नि सोन्या पाठोपाठ निघाले.

"जपून जा बरं का तिघंही जण!" सोन्याकडे पाहात तिनं हसून म्हटलं. जणू तिला दाखवायचं होतं, जरी सोन्या तिच्याकडे संशयानं पाहात होता, तिचा तितकासा मान ठेवत नव्हता, तरी ती मात्र त्याच्याशी नीटच वागत होती, "योग्य वेळी या तुझ्या मित्राला समजावून दे सगळं," तिनं मंजिरीला सांगितलं.

ममता तिच्या घराच्या फाटकाशी उभी राहिली. त्रिकूट तिचा निरोप घेऊन निघालं. त्यांनी मागे वळून पाहिलं, तेव्हा ममताच्या घराचं दार लावलेलं होतं. घर शांत होतं. ती तिघं त्या घरात जाऊन आली होती, त्यांना माहिती होतं ममता तिथे राहते म्हणून, नाहीतर त्यांना जर कुणी सांगितलं असतं की, इथे कुणी राहतं, तर त्यांनी या सांगण्यावर मुळीच विश्वास ठेवला नसता.

************

# पराक्रमी त्रिकूट-६

## पिशवीतील भानगड

ती ममतेच्या घरापुढून निघून सरळ जाणाऱ्या रस्त्यानं वळणावर आली. आता ते रानमानव येणार की काय? त्यांच्या पोटात गोळा उठला. जवळच्या झाडांकडे त्यांनी नीट पाहिलं. झाडांपलीकडच्या मोकळ्या मैदानातून कुणी त्यांच्यावर लक्ष ठेवतंय की काय, ते त्यांनी पाहिलं. पण सगळं कसं शांत होतं. त्यांच्या चालण्यामुळे पानं वाजत होती. शिवाय त्यांच्या श्वासोच्छ्वासाचा जेवढा आवाज येत होता, तेवढाच काय तो आवाज. या शांततेत बोलणं सगळ्यांच्याच जिवावर येत होतं.

जिथे त्यांना बसनं आणून सोडलं, ती जागा अजून खूपच लांब होती. लवकर घरी पोचण्याच्या दृष्टीनं ती भरभर चालत होती. सोन्या त्या तिघांत उंच असल्यानं लांब लांब ढांग टाकत चालला होती. पण त्याच्याबरोबर चालणं मन्याला आणि मंजिरीला कठीण पडत होतं.

“लवकर उचला पाय,” त्यानं घाई करत म्हटलं. पुढच्या वळणावर जाऊन तो त्यांची वाट पाहात होता.

“अरे हो,” मंजिरीची दमछाक होत होती. ती मन्याच्याही पाठीमागे दहा पंधरा पावलं चालत होती.

“माहीत आहे, पळण्याच्या शर्यतीत पहिला आला आहेस ते,” मन्यानं म्हटलं. सोन्यानं शर्यतीत पळताना मधेच आपटून गुडघे फोडून घेतले होते. त्या आठवणीनं सोन्याचा पारा चढला. ‘मूर्ख आहे,’ असं पुटपुटत तो नुसता उभा राहिला होता, त्याऐवजी अतिशय सावकाश चालायला त्यानं सुरुवात केली.

पुढच्या मैदानात ती येऊन पोहोचली. बसकडे जायचा रस्ता आणखी पुढे होता. सोन्या नि मन्यानं तिकडे चालायला सुरुवात केली. पण मंजिरीनं त्यांना थांबवलं.

“थांबा रे इथे जरा,” ती म्हणाली.

“दमलीस नं!” चिडून सोन्या म्हणाला.

“चिडका बिब्बा. ऐक जरा. पहा जरा मुकाट्यानं.” तिनं हातातल्या पिशवीतून काही तरी काढलं. मन्या आणि सोन्या बघत राहिले.

“काय भानगड आहे ही?” सोन्यानं मन्याकडे पाहात म्हटलं. मन्यानं समोर पाहात फक्त खांदे उडवले.

“विचार काय आहे तुझा मंजिरी?” न राहावून सोन्या म्हणाला. इथे जादूचे प्रयोग करत घरी जाऊन बोलणी खायची हौस आलीय का?”

“अरे, घरीच जाणार आहेत आपण, इथेका राहायचंय?”

“मग थांबलोय कशाला इथे?”

“तेच तर दाखवत्ये, पण तुला दम निघेल तर नं? शिवाय आपल्याला लवकर परतायचंय!”

“कुठे?”

“इथे.”

“कशाला?”

“ते पदक ममतेला परत करायला. तिनं मागितलंय ते.”

“तिला कसं कळलं?”

“मी सांगितलं.”

“पण कशाला?”

“कशाला काय? आपल्या मागे त्या पदकाची कटकट कशाला? जादू आहे त्यात. ते एकदा गेलं आपल्या हातातून की सुटलो आपण.” मन्यानं मधेच म्हटलं.

“शिवाय समशेरबहाद्दर परत आलाय.” हे सांगताना तिचे हात थरथरत होते. हवा जड झाल्यासारखी वाटली. काही तरी वाईट घडणार आहे खास. उगीचच आपण यात गुंतलो.

मंजिरी ती पिशवी घेऊन थोड्या अंतरावर जाऊन उभी राहिली. त्यातून प्लास्टिकच्या पिशवीसारखं पारदर्शक असं काही तरी तिनं काढलं.

“ममतेची पिशवी. हिच्याजवळ कशी आली? आपण कशी आत्तापर्यंत तिच्याजवळ पाहिली नाही?” मन्या पुटपुटला.

“कारण आपलं लक्ष नव्हतं लवकर परतायच्या गडबडीत.” सोन्यानं आपला उफाळत असलेला राग आवरत म्हटलंच. मन्यानं डोळ्याच्या कोपऱ्यातून सोन्याकडे पाहिलं नि पुन्हा मंजिरी काय करते हे पाहायला सुरुवात केली. तिनं ती पिशवी घेऊन तिच्या बाजूला जी धरायची कडी होती, ती आपल्या हातात अडकवली. पिशवी जड ओझं घ्यायला पाठीवर टाकावी तशी मानेमागे सोडली. पिशवीला दोन गोंडेदार दोऱ्या होत्या, त्या ओढल्या. चार पावलं अनिश्चितपणानं टाकली. डावीकडून उजवीकडे वारा वहात होता. ठीक. तिनं उजवीकडे तोंड केलं नि पुन्हा चार पावलं टाकली. हात वरखाली केले. तिचा झोक जात होता. आधारासाठी तिनं पाय जमिनीत रोवायचा प्रयत्न केला. पण छे! पाय पुढेच जात होते. हात हलायचे थांबले तेव्हा पुढे एक दोन पावलांवर ती पडता पडता वाचली. पुन्हा तिनं पिशवी नीट केली. त्याच दिशेनं तशीच पावलं टाकली. हात वर खाली हलवले. मन्या, सोन्या ते बघतच राहिले. मंजिरीचं काय चाललंय ते त्यांना कळतच नव्हतं. मंजिरीचे केस वाऱ्यावर उडत होते. नाही, नाही, मंजिरीच उडत होती. आपण स्वप्नात तर नाही ना? त्यांनी स्वतःला चिमटा घेऊन पाहिला. हे स्वप्न नव्हतं. मंजिरी खरंच उडत होती. दोन पायांवर नीट चालणारी, त्यांच्याबरोबर शाळेत जाणारी, खेळणारी, भांडणारी मंजिरी हे काय करत होती? पक्ष्यांसारखी काय उडत होती?

मंजिरीनं फूटभर उंच जात हळूच उजवा हात खाली करत नि डावा हात वर करत गिरकी घेतली. हात खाली करत हळूहळू खाली येत ती त्यांच्यासमोर उभी राहिली. तिला खूप आनंद झाला होता. घरट्याकडे परतणाऱ्या पक्ष्यांकडे पाहात डोळे वर करत तिनं मनात म्हटलं, “तुम्हालाच उडता येतं असं नाही बेट्यांनो, मला सुद्धा येत. पंखांशिवाय.”

“पटली जादू?” तिनं म्हटलं. जवळच्या पिशवीतून आणखी दोन तशाच पारदर्शक पिशव्या काढत तिनं म्हटलं, “एक सोन्या तुला, नि ही मन्या, तुला.” पिशव्या खूप हलक्या होत्या. हातात घेऊन सुद्धा त्यांचं वजन असं काहीच जाणवत नव्हतं.

“हं, घाला हे बंद हातात. हं, आता ते गोंड्याचे बंद ओढा. हळू, पडशील.”

झपाटल्यासारखं मन्यानं ती सांगत होती तसं केलं. एक, दोन, तीन, चार- पटापट हात खाली वर केले. हवेचा एक झोतच्या झोत त्याच्या पायाखालून गेल्याचं त्याला जाणवलं. घेरी तर नाही ना आली आपल्याला! त्यानं खाली पाहिलं. मंजिरी आणि सोन्याच्या उंचीएवढ्या उंचावर तो होता. अरेच्या! म्हणजे आपण पण खरंच उडायला लागलो की! पण आता उतरायचं कसं? त्यानं हाताची हालचाल मंद केली. तो सावकाश जमीनीवर उतरला. जमीनीवर पाय ठेवल्यावर कसं हायसं वाटलं त्याला! पण या धांदलीत तो मैदानाच्या दुसऱ्या टोकाला जाऊन पोचला होता. त्यानं पुन्हा उडायला सुरुवात केली. पीछे मुड करत तो पुन्हा पहिल्या जागी येऊन पोचला.

“अरे, काय मजा वाटते!” मन्यानं सोन्याच्या पाठीवर थाप मारत म्हटलं. “अरे, पण तू उभा का? ऊड ना पक्ष्यासारखा.मन्यानं हात पंखासारखे वर खाली केले. एक छोटीशी उडी घेत तीन चार पावलांवर तो उभा राहिला. “अरेच्या, मी तर ती पिशवी काढलीच नाही!” त्यानं नकळत हात हलवताच पिशवी बांधलेलीच असण्यानं तो उडाला होता.

सोन्या पिशवी हातात घेत तिच्याकडे बघतच उभा राहिला होता. मन्यानंपुढे होत पिशवीचे बंद सोन्याच्या हातात अडकवले. “हं, एक, दोन, तीन. उडना शुरू!” सोन्यानं एकीकडे त्या दोघांना उडताना पाहिलं होतं नि दुसरीकडे त्याला वाटत होतं, हा भ्रम तर नाही ना! तरी यांत्रिकपणानं पिशवीचे बंद ओढत त्यानं हात हलवले. दोघांचे प्रयत्न बघून त्याला त्यांच्यापेक्षा जास्त शिक्षण मिळावं होतं. सुरुवातीलाच त्यानं उंच भरारी मारली. बघता बघता तो झाडाच्या वरच्या फांदीच्या जवळून गेला. तिथून आपण वेगळयाच जगात प्रवेश केलाय असं त्याला वाटायला लागलं. विमानातून जाताना असंच वाटत असेल. त्यानं पाहिलेल्या सिनेमांवरून खाली केलेल्या चित्रणासारखंच हे दृष्य होतं. फरक एवढाच की ते टिपणारा उंचावरचा किंवा विमानातला कॅमेरा होता आणि हे पाहाणारे त्याचे खरे डोळे होते. ते पाहात होते, ते सुद्धा खरंच दृष्य होतं. हिरव्या रानात सापासारखे वाटणारे रस्ते दिसत होते. समोर निळं आकाश दिसत होतं. खाली रुमालासारख्या सरलेल्या मैदानावर भावल्यांसरखी मन्या आणि मंजिरी उभी होती.

“अरे, मी सुद्धा उंच उडतोय!” त्यानं आरोळी ठोकली.

“खाली ये लवकर, मरायचंय का?” मन्यानं ठोकलेली आरोळी त्यानं ऐकली. हात खाली करत जणू पॅराशूटसारखा तो खाली आला. त्या दोघांच्या समोर उभा राहिला. त्याचे केस वाऱ्यावर उडत होते. विजयाचा आनंद त्याच्या डोळयांतून ओसंडत होता. हा अनुभव कसा व्यक्त करावा हे त्याला कळत नव्हतं. पण मग त्याच्या लक्षात आलं, की ही दोघंसुद्धा हे करू शकतात की! आपलंच काय विशेष आहे? त्यानं भुवया वर उचलत प्रश्नार्थक मुद्रेनं विचारलं, “आता काय?”

“आता घर.”

आपापल्या पिशव्या पुन्हा गोळा करून खिशात घालत ती निघाली. बस थांबायच्या ठिकाणी येऊन पोचली. तेव्हा बसचा पत्ता नव्हता. आता मात्र घरी गेल्यावर काय सांगायचं, हा यक्षप्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला. 'मारायच्या बाता,' मन्यानं म्हटलं. म्हणणं सोपं होतं, पण करणं तितकंच कठीण होतं हे त्यालाही माहीत होतं. पण मग तेव्हाचं तेव्हा पाहू असं म्हणून तो प्रश्न वेगळा करत परत तिथे येण्याची चर्चा करायला त्यांनी सुरुवात केली.

"आज तर शक्य नाही, रात्र व्हायला आली. आता उद्या. " मंजिरी म्हणाली.

"अगं, पण लवकरात लवकर यायचं नाहीये का?"

"म्हणून काय रात्री बाहेर पडता येणार आहे का? तू काय, मागच्या दारानं बाहेर पडून जाशील, पण मला नाही यायचं तसं करता."

"बरं मग उद्या. लवकरात लवकर."

"हो--- मला नाही का काळजी? मला तर असं झालंय, कधी ते पदक ममतेच्या स्वाधीन करून मोकळे होतोय आपण?"

अखेर बस आली.

"थोडं उशीरा निघालो असतो, तर बसची कटकट नव्हती. झकासपैकी उडत गेलो असतो."

"आता आणखीन उशीर करायचा होता का?" सोन्यानं विचारलं.

"शिवाय आपल्याला खाली उतरताना घराजवळ कुणी पाहिलं असतं म्हणजे?"

"श्ः! हळू बोल. पलीकडच्या लोकांना ऐकू नाही जाता कामा."

त्यांनी आवाज कमी केले. पण त्यामुळे जेव्हा लोक वळून पाहाला लागले, तेव्हा आता गप्प पाहण्यातच शहाणपणा आहे, म्हणून इकडे तिकडे पाहात ती बसून राहिली.

त्रिकुट बसस्टॉपवर उतरलं, तेव्हा रस्त्यावर दिवे लागले होते. बाहेर फिरायला निघालेल्या लोकांनी रस्ते पूर आल्यासारखे दुथडी भरून वाहात होते. आजपर्यंत या रस्त्यांनी ती कित्येक वेळा गेली होती. आज मात्र त्यांना सगळीकडे संशयानं पाहायची इतकी सवय लागली होती की इथेही काही दगाफटका नाही ना या संशयानं ती इकडे तिकडे पाहात होती. शेजारून जाणारी माणसं नेहमीचीच माणसं आहेत ना की ती दुपारची—आकाशात कुणी उडत तर नाही ना?

"कुणी तरी लक्ष ठेवून आहे रे आपल्यावर!" सोन्यानं म्हटलं. त्यांनी इकडे तिकडे पाहिलं. या गर्दीत कोण त्यांच्यावर लक्ष ठेवून होतं, हे सांगणं कठीण होतं. पण तसं वाटत होतं खरं! जणू कुणी त्यांचा पाठलाग करतंय! उंच इमारती, अंधारी घरं, गर्दी, सगळं कसं भीषण वाटत होतं.

पण सुदैवानं काहीच विपरीत न होता ती घराशी येऊन पोचली. आपापल्या घराकडे निगाली

मंजिरी घरी पोचली तेव्हा आईसाहेबांचा पारा चढलेलाच होता. त्यांनी तिच्याशी काही न बोलता तिला जेवायला वाढलं. इतरांची जेवणं झालेली दिसत होती. मंजिरीनं खाली मान घालून जेवण घशाखाली घातलं.

“परवाच्या त्या कुत्र्याच्या प्रकारानंतर तरी तू घरी नीट वेळेवर येशील असं वाटलं होतं. पण कसलं काय?” असं म्हणत तिच्या आईनं दाणकन् स्वयंपाकघराची खिडकी लावली. “शिवाय आज संध्याकाळी एक काळाभोर कुत्रा गल्लीभर फेऱ्या मारत होता.”

“आई, खरंच?” मंजिरीच्या चेहऱ्यावर मूर्तिमंत भीती दिसत होती.

“नाही, खोटं. अजून हिंड उशीरापर्यंत.” आईनं टोमणा मारला.

मंजिरीनं पळत पळत जाऊन पलंगाखाली असलेल्या पदकाकडे धाव घेतली. आत्तापर्यंत  ते कुत्रं आपल्याशिवाय कुणाला दिसलं नव्हतं. आज तर गल्लीभर हिंडत होतं. कहरच झाला म्हणायचा. आता हे पदक तरी कुठे दडवावं नि परत ममतेकडे कसं नेऊन द्यावं कोण जाणे.

पलंगावरची गादी बाजूला करत तिनं पदकाला हात लावून ते चाचपलं. तिचा तिच्यावरच विश्वास बसेनासा झाला होता. तिनं खात्री करून घेण्यासाठी दिवा लावून पुन्हा एकदा पाहिलं, ते पदक सुखरूप आहे की नाही ते. नि सुटकेचा निःश्वास टाकला.

**************

# पराक्रमी त्रिकूट-७

## पुन्हा एकदा ममतेच्या घरी

दुसऱ्या दिवशी सुट्टी होती. तिघांच्याही घरची सगळी माणसं घरी असल्यामुळे त्यांना दिवसभर मुळीच काही हालचाल करायला वाव मिळाला नाही. पण संध्याकाळी कुणी फिरायला, कुणी कुठे अशी निघून गेल्यावर मंजिरीच्या अंगणात ती जमली.

“काल आईनं पाहिलं त्या कुत्र्याला!” मंजिरीनं माहिती पुरवली.

“मग काय म्हणाली आई?”

“काही नाही. तिचा पारा चढला होता. आणखी काही बोलली नाही ती. आपण आताच दिवसाउजेडी ममतेकडे गेलो तर?”

मंजिरीच्या या सूचनेवरून ती तिघं बसमधून निघाली.

सोन्यानं बसमधून डोकावून पाहायला सुरुवात केली, तसं या दोघांचंही लक्ष वेधलं गेलं. त्यांचेही डोळे सोन्या जिकडे पहात होता तिकडे वळले. बसच्या पुढच्या बाजूनं एक काळा केसाळ कुत्रा गर्दीतून मार्ग काढत चालला होता. मधून मधून थांबत आपण बसपासून दूर राहात नाही ना हे तो पाहात होता.

“तो, ‘तो’ कुत्रा नसेलही,” मन्यानं म्हटलं, पण इतक्या अस्पष्टपणे तो बोलला की ते त्याचं त्यालाच पटलेलं दिसत नव्हतं. दोनचार क्षण मन्यानं हाताची घडी घालून डोळे मिटून विचार केला.

“चला, उतरा खाली,” त्यानं म्हटलं. जवळच्या स्टॉपवर ती उतरली. गर्दीतून वाट काढत फूटपाथवर चढून त्यांनी पाहिलं. कुत्रा तिथेच होता. त्यांच्याच मागावर असल्यासारखा.

“ते पाहिलंत?” सोन्यानं म्हटलं. समोर एक पडकी इमारत होती. तिच्यावर मनोऱ्यासारखी रचना केलेली होती.

“हो, मग?” मन्यानं विचारलं.

“ती इमारत म्हणजे जुन्या किल्ल्याचा पडका अवशेष आहे. तिच्या पलीकडे खंदक नाही का? इथूनच तर आपल्या गावाची हद्द सुरू होते. त्यांना काहीतरी करून या भिंतीच्या आत- त्यांच्या साम्राज्यात असतानाच तो बिल्ला आपल्याकडून काढून घ्यायचा आहे. म्हणून तो कुत्रा आपल्या मागावर आलाय.” मंजिरीनं म्हटलं.

त्रिकुटानं उलट दिशेनं भराभर चालायला सुरुवात केली. पण आता त्या कुत्र्याला संशय आला होता. तो बसच्या मागच्या बाजूनं इकडे तिकडे पाहात होता. बसच्या इंजिनाची घरघर बंद झालेली त्यांना जाणवली. बस एकाएकी थांबली. कुत्र्यानं गोंधळून इकडे तिकडे पाहिलं. तो एका झाडाच्या सावलीत जाऊन बसला. त्याची तीक्ष्ण नजर सगळीकडे शोधकपणे फिरत होती.

त्या किल्ल्याच्या वरच्या बाजूला काहीतरी हालचाल झाली. कुणी तरी पुढच्या बाजूची खिडकी उघडली नि पुन्हा लावून घेतली. रानामध्ये मंजिरीला जेव्हा कुत्र्यानं धरलं होतं, तेव्हा ममतेच्या आगमनानंतर कुत्रा परत जाण्याच्या वेळी जशी लांब शीळ ऐकू आली होती, तशीच शीळ आताही ऐकू आली. कुत्र्यानं चारही पायांवर उभं राहात अंग झटकलं व तो किल्ल्याच्या दिशेनं संथपपणे चालू लागला. बसनंही खर्र असा आवाज केला नि ती चालू लागली.

"हं. म्हणजे आपल्याला या ठराविक जागेच्या बाहेर जाऊ द्यायचं नाही असा त्यांचा डाव दिसतोय." मन्या म्हणाला.

रात्री परत भेटण्याचं ठरवून ती सगळी घरी परतली.

मंजिरीनं दहाचा ठोका पडलेला ऐकला व ती या कुशीवरून त्या कुशीवर वळली. साडेदहा वाजले की उठायचं. तोपर्यंत सगळीकडे शांत झालं असेल, तिनं विचार केला.

साडेदहाचा ठोका पडला. तशी ती उठली. बाहेर जायचे कपडे तिनं अंधारातच चढवले. हो, दिव्याच्या उजेडानं कुणी उठलं तर पंचाईत व्हायची. दार न वाजवता तिनं खोलीचं दार उघडलं, नि ती मागच्या दाराकडे वळली. आईला कळलं तर--? पण आता असला काही विचारच करायचा नाही. सावकाश बूट पायात चढवून तिनं भिंत चाचपत दार गाठलं. पण ते नेहमीच्या वापरात नसल्यानं त्या दाराची कडीच निघेना. जोर करावा, तर सट्‌कन कडी निघून आवाज व्हायचा!

ठोक्यासरशी मन्याही उठला होता. कॅनव्हासचे बूट चढवत स्वारी निघाली. पण शेजारी झोपलेल्या भावानं हाक मारली असं वाटून तो दचकला. तो उठला तर सगळंच मुसळ केरात. पण मग त्यानं पाहिलं, त्याचे डोळे मिटलेले होते नि तो झोपेतच काही तरी बोलत होता. आदल्या रात्रीची मारामारी आठवत होती बहतेक स्वारीला! की झोपेतही त्याची फाईट चालली होती, कोण जाणे! झोपेतच शेजारी त्यानं हात टाकला तरी तो नसल्याचे भावाला जाणवू नये म्हणून त्यानं उशीवर जाड पांघरूण घालून टाकलं. मन्या बाहेर पडला. मंजिरी दाराशी होती, तेव्हाच त्यानं शटरमधून पाहिलं नि म्हटलं, "स्कार्फ मधे घालून कडी ओढ."

सूचनेप्रमाणे दार उगडून तिनं ते पुन्हा बाहेरून लावून घेतलं आणि सोन्याच्या घराकडे पाहिलं. त्यांच्याकडे अजून दिवे जळत होते. "त्यांच्याकडे उशीरा झोपतात." मंजिरीनं सांगितलं.

"आता याला चांगलाच उशीर होणार," मन्या म्हणाला. एवढ्यात सगळे दिवे मालवलेले दिसले.

"सुटलो," मंजिरीनं निःश्वास सोडला.

घराच्या सावलीतून सावकास एक काळी छाया येताना दिसली. मंजिरीनं नि मन्यानं तिला जाऊन गाठलं.

"अरे काय!" मन्याच्या पाठीवर थाप मारत सोन्यानं म्हटलं, "बाहेरचं मुख्य मीटरचं कनेक्शनच तोडलं. बाबांना वाटलं, आपोआप गेले दिवे. नाही तर आज काही बाहेर पडता येत नव्हतं बाबा."

तिघांनीही गरम कपडे घातले होते. आधीच थंडी, त्यात आकाशात वर उडायला लागलं की ती आणखीच बोचायची!

रस्त्याच्या मधून ती चालत होती. रात्रीची वेळ होती. त्यामुळे रहदारीचा प्रश्नच नव्हता. फक्त या वेळी गस्त घालणाऱ्या पोलिसांकडून भीती होती.

तिघांनीही एकदमच त्या कुत्र्याला पाहिलं. नेहमीप्रमाणेच तो त्यांच्या पाळतीवर होता. "पळा," सोन्या म्हणाला. त्यांनी डावीकडे वळत पळायला सुरुवात केली. पण कुत्र्यानं गाठलंच त्यांना. त्यांनी वेग कमी केला, तसा कुत्र्यानंही वेग कमी केला.

"त्याचा हेतू फक्त आपल्यावर पाळत ठेवायचा दिसतोय." सोन्या म्हणाला. ते तिघंही सावकाश चालू लागले. खरं म्हणजे त्यांनी उजवीकडून जायचं ठरवलं होतं, पण त्याच गल्लीत बंद होणाऱ्या दुकानाच्या दाराशी उभा राहून पोलीस दुकानदाराला दम भरत होता. त्याचं लक्ष वेधून न घेणंच त्यांच्या हिताचं होतं. म्हणून ते बागेकडे वळले,

"कुत्र्याच्या नकळत बागेत शिरायला हवं," सोन्या म्हणाला.

"पण का? इथूनच पिशव्या बांधून उडालो तर?"

"अगं, पण तो कुत्रा बघेल ना!"

"त्यानं पाहिलं तर पाहिलं!"

"शहाणीच आहेस, कुत्र्याबरोबर त्याचा मालकही पाहात असतो, त्याचं काय?"

कुंपणातून वाट काढत ती बागेच्या आत गेली. दिवे असले, तरी जागोजागी झाडांच्या दाट सावल्या पडल्या होत्या. कुत्रा अजून मागच्या वळणावरच होता. त्यांनी चालतानाच खिशांतून पिशव्या काढत खांद्यावर टाकल्या. हातात अडकवत त्यांचे दोरे ओढले नि चार पावलं पळत उडायला सुरु केली. हळूहळू झाडं खाली गेली. कुत्रा सावल्यांमध्ये घुटमळत त्यांना शोधत होता.

त्यांनी उडत रानाकडे जायला सुरुवात केली तेव्हा चांगलं चांदणं पडलं होतं. "या प्रकाशात कसा रस्ता सापडणार आपल्याला, अशी शंका त्यांना गावाबाहेर पडेपर्यंत होती: पण जसे गावातले दिवे लांब, दिसेनासे झाले, तेव्हा त्यांना समजलं, चांदणं किती छान पडलं होतं. वेळ आणीबाणीची होती म्हणून, नाही तर मन्यानं गायलाच सुरुवात केली असती, "चमचम चांदण्या गगनात----"

पण त्यांना हे जाणं जितकं सोपं वाटलं होतं, तितकंही सोपं नव्हतं. कारण रान जवळ आल्यावर झाडांनी उंच मंडप धरला होता. त्यामुळे चंद्रप्रकाश जमीनीपर्यंत जाणं जवळजवळ मुश्किलच झालं होतं. त्या मंडपाखालचं ममतेचं घर शोधून काढणं जरासं अवघडच होतं. रस्ता जिथे रानातून वाट काढत पुढे जात होता, तिथे तेवढा जमीनीपर्यंत प्रकाश पोचत होता. "हा रस्ताच आपला गाईड बरं का!" सोन्यानं म्हटलं. रस्ता नागमोडी वळणांनी जसजसा पुढे जात होता, तसतसं त्याच्यावरून उडत जायला त्यांनी सुरुवात केली.

"आलो आपण!" मंजिरीनं म्हटलं. हात खाली घेत तिनं जमीनीकडे जायला सुरुवात केली. पण मग तिच्या लक्षात आलं की ही जागा मागे आपण पाहिलेल्या जागेच्या दुप्पट तिप्पट मोठी आहे. तिनं मागे वळून पाहिलं तर तिला जाणवलं की अजून गावातले दिवे दिसेनासे झाले नाहीत. म्हणजे आपल्याला जायचंय ते ठिकाण अजून लांब आहे. आपण अजून गावाच्याच जवळ आहोत.

“अरे, ही नाही ती जागा.” मंजिरी म्हणाली.

“तरी म्हटलं इतक्या लवकर कसं पोहोचलो आपण?” मन्या म्हणाला.

त्यांनी पुन्हा रस्त्याच्या वरून वरून पुढे जायला सुरुवात केली.

“हीच का रे ती जागा?” मंजिरीनं विचारलं.

“तीच म्हणजे कुठली?” इति सोन्या .

“म्हणजे जिथे त्या कुत्र्यानं मला पकडलं ती- तीच जागा वाटतेय.” मंजिरी म्हणाली.

तिघांनीही खाली यायला सुरुवात केली. मैदान दिसू लागलं होतं. आजूबाजूच्या जंगलानं मागे सरून जागा करून द्यावी, तसा तो हरितमान पडलेला दिसत होता. त्याच्या जवळपासचं जंगलही त्याला भिऊन पळालं होतं. खालून त्यांना दिसलंच होतं, पण आता उंचावरून त्यांना त्याच्या शरीराची कल्पना येत होती. एक हात त्यानं लांब पसरलेला होता. त्याच्या मानेजवळ जरा खाली गेलेली जमीन छाती-पोटापर्यंत चांगली पुरुषभर उंच दिसत होती. वरून त्या शरीराचा भरीवपण चांगलाच जाणवत होता.

“त्याचा दुसरा हात पूर्वीच्या जागी नाही.” मन्यानं खाली पहात म्हटलं.

“मग कुठाय त्याचा हात? त्यानं उचलून ठेवलान की लपवून ठेवलान कुठे?” सोन्यानं म्हटलं; पण मग खाली पाहात तो गप्प झाला. त्याच्या हाताजवळची जमीन उखडल्यासारखी दिसत होती नि तो हात त्यानं आपल्या छातीजवळ घेतलेला होता. काय असावा याचा अर्थ? त्यांच्या मनात विचार चालला होता. इथे काही तरी उलथापालथ झाली हे नक्कीच!

“इथलं जाऊ दे, आधी ममतेकडे जाऊ या.” मंजिरीनं म्हटलं.

ममतेच्या घराकडे नेणारं वळण पार करून त्यांनी इकडे तिकडे पाहिलं, तेव्हा तिच्या घरातला लुकलुकणारा दिवा त्यांना दिसला. “तो बघा दिवा. मन्या म्हणाला. त्या दिशेनं जायला लागल्यावर हळूहळू तो दिवा मोठा मोठा वाटायला लागला. शेवटी तर त्यांनी त्या दिव्याच्या प्रकाशातच मधले झाडांच्या फांद्यांचे अडथळे दूर केले. ती घराच्या कुंपणाजवळ येऊन पोचली. आता जायला सोपं पडावं म्हणून त्यांनी आधी जमीनीवर उतरायचं ठरवलं.

“श्‌! पोचलो एकदाचे.” मंजिरी कुजबुजत म्हणाली. तिनं सगळीकडे नजर टाकली. ती यापूर्वी इथे दोनदा येऊन गेलेली होती. पण त्यामुळे या वेळचा तिथला वेगळेपणा तिला जाणवला. वूर्वी रानातल्या शांततेत सुद्धा या घराजवळ काही तरी ऊब जाणवायची. काहीततरी जिवंतपणा वाटायचा. पण आता सगळं शात होतं. स्तब्ध होतं. वाऱ्यानं पानं जी हलतील आणि त्यांचा जो आवाज होईल तेवढाच. त्यात या तिघांच्या श्वासोच्छ्वासाच्या आवाजाची भर पडत होती. मंजिरीनं बेचैनपणे आपल्या मित्रांकडे पाहिलं. त्यांनाही ही स्तब्धता जाणवलेली दिसली.

“जायचं आत?” तिनं विचारलं.

“नको. त्यापेक्षा तिलाच बाहेरून हाका मारल्या तर?” मन्यानं म्हटलं आणि हाका मारल्या,’ममता, ममता—’

पण छे! एक नाही, दोन नाही. पानांच्या सळसळीनं जी साथ दिली तेवढीच. घरातून काहीच उत्तर आलं नाही की हालचाल जाणवली नाही!

"आपण वर जाऊन पाहू या, घरात काय आहे, काय नाही ते," सोन्यानं सुचवलं. त्यांनी पाठीवरच्या पिशव्या चाचपत, पुढचे गोंडे ओढून झाडाइतकी उंची गाठली. झाड घराच्या छताजवळच होतं. त्या छपरावर अलगद उतरत त्यांनी सावधपणे सगळीकडे पाहिलं. पण कुठेच काहीच हालचाल नव्हती.

"ते- ते कसलं भोक आहे त्या छपराला! त्यातून पाहू या आतलं.," सोन्या म्हणाला. मागच्या बाजूला असणाऱ्या झरोक्याजवळ जाऊन तिघांनीही आत डोकावून पाहिलं. आत दिवाणखाना दिसत होता. सगळ्या वस्तू जिथल्या तिथे होत्या. टेबल तेवढं रिकामं होतं आणि ममतेचा पत्ता नव्हता.

त्यांनी एकमेकांकडे पाहिलं.

"काही नाही, आता आतच जाऊन पाहायला हवं," मन्या म्हणाला. छपराच्या कडेशी जाऊन तो उभा राहिला. सोन्या नि मंजिरींनी हवेत झेप घेऊन एका फांदीवर मुक्काम ठोकला होता. त्यांचं लक्ष मन्याकडे होतं. आता हा आत उडी घेतो की काय? त्यांची मात्र आत जाण्याची हिम्मत होत नव्हती. मन्या मागे जसा त्या रानमानवांना सामोरा गेला होता, तसा धीर करून आताही जातो की काय, अशा नजरेनं त्यांनी एकमेकांकडे पाहिलं. पण मन्याचा अजून निश्चय झालेला दिसत नव्हता. पिशवीचे गोंडे हातात धरून, छपराच्या उतरत्या बाजूकडे पाठ करून झरोक्याच्या दिशेनं पाहात विचार करत तो तसाच उभा राहिला.

आता मात्र घराच्या आतल्या बाजूला काहीतरी धडपड झाल्याचं सोन्यानं पाहिलं. एक सावली बाहेर आली. दाराजवळच्या झुडपांवर पाय दिल्याचा आवाज आला. एक हात छपराच्या कडेजवळ दिसायला लागला. त्याच्यावर जोर देऊन एका रानमानवाचं शरीर छपरावर पोचलेलं त्यांनी पाहिलं. त्याचा रोख मन्याच्याकडेच होता. बापरे, आता काय होणार तरी काय! त्यांना कळेना. पण सोन्या पहिल्यांदा भानावर आला. त्यानं मोठ्यांदा हाक मारली, "मन्या—" त्याबरोबर गर्रकन वळत मन्यानं आवाजाच्या दिशेनं पाहिलं, तशी आपल्यावर चाल करून येणारी आकृती त्यानं पाहिली. क्षणभर तोही उभा राहिला. पण नंतर मात्र काय संचारलं त्याच्या अंगात कोण जाणे, बाजूला उडी मारत, हातातले गोंडे जोरानं ओढत त्यानं परत हवेत जोरात उडी घेतली.

मंजिरी आणि सोन्यानं हवेत उडायला आधीच सुरुवात केली होती. त्याच्या त्या ओरडण्यानं, घराच्या आतल्या बाजूनं आणखी रानमानवांनी बाहेर यायला सुरुवात केली. पहिल्यांदा सुरू झालेल्या ओरड्याचं गोंगाटात आणि नंतर किंकाळ्यांमध्ये रूपांतर होत होतं. त्यानं नकळत कानावर हात ठेवले तरी तो आवाज मधला अडथळा दूर करून कानाच्या पडद्यावर जाऊन पोचत होताच. त्यानं मंजिरी नि सोन्या ज्या दिशेनं मगाशी गेले, तिकडे पाहिलं. ते बरेच लांब गेले होते. त्या एवढ्या मोठ्या शांत रानात त्यांच्या उडणाऱ्या आकृत्या छोट्या दिसत होत्या. त्यांना गाठायला हवं. इथून नाहीसं व्हायला हवं. त्यानंही हात पसरत मंजिरी आणि सोन्याच्या दिशेनं जायला सुरुवात केली.

*****

# पराक्रमी त्रिकूट-८

## ममतेचा शोध

त्यांनी गावाच्या दिशेनं जायला सुरुवात केली. त्या रानातल्या भयानकपणाचा नि मनावर ताण घेऊन वावरण्याचा त्यांना कंटाळा आला होता.

“घरी जाऊन झक्कपैकी झोप काढावीशी वाटते,” मंजिरी म्हणाली, “उडायचा आता अगदी कंटाळा आलाय. हातही दुखताहेत माझे.”

“हो बुवा, माझेही हात दुखताहेत,” सोन्या म्हणाला.

“मला वाटतं, आता घरी परतावं झालं.” मंजिरी म्हणाली.

“घरी? मग आता बाहेर कशाला पडलो आपण, हात हलवत परत जायला? आठव, त्या दिवशी त्या ममतेनं येऊन तुला त्या कुत्र्यापासून वाचवलं नसतं, तर काय झालं असतं तुझं? आत्ता ही कौतुकं करायला शिल्लक राहिली असतीस का? आणि त्या ममतेला आता संकटात सोडून आपण खुशाल ‘निघून जाऊ’ असं म्हणायला तुला काहीच वाटत नाही?” मन्यानं कानउघाडणी केली.

“पण कशावरून ती संकटात आहे? कदाचित ती सुखरूपही असेल.” सोन्यानं झोपाळल्या डोळ्यानं म्हटलं.

“जागा आहेस का झोपेत बडबडतोयस? या झऱ्याचं पाणी लाव जरासं डोळ्यांना, म्हणजे डोकं ठिकाणावर येईल.” मन्यानं म्हटलं.

त्यांनी हात खाली वळवत झऱ्याच्या काठी आपली विमानं उतरवली. डोळ्याला पाणी लावल्यावर त्या गारव्यानं त्यांची झोप तर उडालीच, पण दमून या थंडीच्या दिवसात सुद्धा आपल्याला खूप तहान लागली आहे आणि श्रमानं तोंडं कोरडी पडली आहेत हेही जाणवलं.

“हे पाणी प्यालो तर रे?” मन्यानं प्रश्न केला.

“या टॉर्चच्या उजेडात हे पाणी स्वच्छ वाटतंय खरं, पण खरं कसं आहे कोण जाणे! शिवाय रानातून वाहणारा झरा! पहा बुवा!!” सोन्यानं आपलं मत दिलं.

“कसंही असलं तरी पाणी आहे हे. आपण तर पिणार.” मंजिरीनं ओंजळभर पाणी तोंडाला सुद्धा लावलं. पण हात गार पाण्यानं गारठले आणि तोंड पण. उडत आल्यानं थंडी जाणवली नव्हती, पण आता ती ऊब हळूहळू नाहीशी होत होती.

“छे बुवा! जास्त पाणी काही पिववत नाही रे.” मन्यानं अनुभव सांगितला.

पाणी प्यावं का न प्यावं या विचारानं सोन्याच्या जिवाची उलघाल होतच होती. आता त्यानंही पाणी प्यायचं ठरवलं. गार पाणी तोंडावर सगळीकडे फिरवलं.

"आता कुढे जायंच आपण?" सोन्यानं विचारलं.

"ममतेकडे." मंजिरी म्हणाली.

"पण ती कुठे आहे हे कुठे आपल्याला माहीत आहे?"

"कदाचित ती घरीही लपली असेल."

"वाटत नाही." मन्या म्हणाला, "कारण ती तिथेच असती तर ते रानमानव तिथे वाटेल तसे फिरले नसते. तिच्या घरात तिनं त्यांना वाटेल तसं आरडू ओरडू दिलं नसते. खरं म्हणजे आत जाऊन आपण बघायला हवं होतं, म्हणजे कळलं असतं ती पळाली कुठे सुरक्षित ठिकाणी का त्या रानमानवांची कैदी म्हणून त्या घरातच होती -"

"त्यांनी तिला आणखीन कुठे नेलं नसेल कशावरून?" सोन्यानं शंका काढली.

"तेच आपण पाहायला हवं होतं, पण ते ऐनवेळी आपल्याला सुचलं नाही."

"हो, आणखी हिम्मत होती का त्या राक्षसांच्या गराड्यातून आत जायची?" मंजिरीनं त्यांना वेडावत म्हटलं.

"बरं बरं, दोनदा त्यांच्याशी सामना द्यायचा प्रयत्न केलाय मी. तुमच्यासारखा शेपटीला पाय लावून पळालो नाही. यश नाही आलं, त्याला काय करणार? 'यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः?'

"पुरे तुझं पांडित्य. हला इथून आता. नाहीतर गोठून जाऊ या थंडीत."

त्यांनी आता एखाद्या सराइतासारखी उडायला सुरुवात केली. सराइतासारखं कशाला, आता इतक्या सवयीनं तीच सराईत झाली होती. त्यांचं उडणं पाहून पक्ष्यांनी माना खाली घातल्या असत्या आणि विमानांनीही पंख पसरून लाजून पलायन केलं असतं.

त्यांनी आकाशात झेप घेतली तेव्हा जाणवलं की ती ज्या बाजूला निघाली होती, त्याच बाजूला वारा वाहात होता.

"आपण इकडे जावं असं वाऱ्यालासुद्धा वाटतंय." मंजिरी म्हणाली. आता दम थोडा गेला होता आणि वाऱ्याच्या मदतीनं उडण्यामुळे जास्त उत्साह आला होता. खाली सारं काही शांत होतं. लांब दूरवर शहरातले दिवे दिसत होते. त्या दिव्यांच्या माळा जणू घातल्या होत्या- कुणी बरं? त्या लढाऊ वीरानं की काय? का आपल्या राजवाड्यापुढे ममतेला पकडल्याबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यासाठी त्यानं दिव्यांची रांगोळी घातली होती!

"अजून दहाएक मैल जायचं आहे." मन्या म्हणाला.

"एवढं!" मंजिरीला वाटलं, हे एवढे दिवे दिसताहेत त्या अर्थी आपण गावाजवळ येऊन पोचलो. गावाहून येताना नाही का दिवे दिसले की पाच दहा मिनिटांत आपण गावात पोचत!"

“आपण उंचावरून पाहातोय म्हटलं बाईसाहेब. खिंडीतल्या वळणावरून नाही.” सोन्यानं म्हटलं. मंजिरीनं आपली सगळी शक्ती एकवटून पुढे जायला सुरुवात केली. इतकं लांब जायचंय म्हटल्यावर तिचा धीरच खचला होता.

तसाच काही वेळ गेला. थोडा वेळ शांततेत, एखादं वाक्य बोलत अशी ती पुढे चालली. बाजूला पसरलेल्या अंधाराच्या समुद्रात दिव्यांच्या प्रकाशानं गावाचं एक बेटच बनवलं होतं. त्या बेटावर एका बाजूला मध्येच एक अंधाराचा पट्टा गेलेला होता.

“मध्येच एवढा अंधार कुठला आहे कोण जाणे!” मन्या म्हणाला.

सोन्या आणि मंजिरीनं मग तिकडे पाहिलं. तेवढा एक पट्टा सोडला तर सगळ्या गावभर दिवे चमकताना दिसत होते.

“अरे,आपलं वीजबोर्ड. मधेच दिवे नाही गेले तर काय हवं!” सोन्या म्हणाला.

एक गाडी त्या पट्ट्याच्याच बाजूला निघाली होती. त्यांच्या नकळत त्यांनी त्या गाडीच्या दिशेनं पाहिलं. ती जशी त्या काळ्या पट्ट्याच्या कडेनं गेली, तशी तिच्या पुढच्या दिव्यांच्या प्रकाशानं रस्ता उजळून निघाला.

“हा तर मनोऱ्याजवळचा रस्ता!” सोन्या नि मन्या जवळ जवळ एकदमच उद्गारले.

“खरंच की!” मंजिरी म्हणाली.

आता त्यांची डोकी वेगळ्याच दिशेनं काम करायला लागली. वीजबोर्डाचा प्रताप आहे हा, असं त्या अंधाराच्या काळ्या पट्ट्याकडे बघून वाटेना. तो पट्टा म्हणजे काही तरी दुष्ट, वाईट, अमंगलाचं ठिकाण आहे असं वाटायला लागलं.

“पुढे जाण्यात अर्थ नाही,” मन्या म्हणाला नि थांबला. कारण ती त्या अंधारातून मार्ग काढणारी गाडी दिसेनाशी झाली होती. तिच्या इंजिनाचा अस्पष्ट आवाज रात्रीच्या शांततेत इतक्या वर ऐकू येत होता तोही थांबला होता. आतापर्यंत तो आवाज आजूबाजूच्या परिस्थितीचाच एक भाग बनला होता. पण तो आवाज थांबल्याबरोबर ओघानं आलेली शांतता त्यांना चांगलीच जाणवली.

“मनोऱ्याजवळ गेल्यावर गाडी बंद पडली,” मंजिरी पुटपुटली. तिला आदल्या रात्रीचा मनोऱ्याजवळचा प्रसंग आठवत होता.

“अस्सं. हा काळा पट्टा म्हणजे गावाची जुनी वेस आहे तर!” मन्या म्हणाला.

“पण अशी भिंत आहेच कुठे मुळी?” मंजिरीनं विचारलं.

“आता अस्तित्वात नसली तरी ती पूर्वी तिथे होती. तिथून राजाची हद्द सुरू होते. आता जपायला हवं. आपल्याला पकडायला ते सगळे अगदी टपले असतील. असल्या लोकांची ताकद रात्री वाढते म्हणतात.!” मन्यानं म्हटलं.

“अगं बाई! आता?” मंजिरी आता खरंच बावरली.

“आता काय, काय होईल ते पाहायचं नुसतं. आपल्या हातात आता काहीच राहिलेलं नाही.” सोन्या म्हणाला.

ती तिघं आता शेजारच्या झाडाच्या फांद्यांवर उतरली.

“ते काय पुढे जातंय?” मंजिरीनं लक्ष वेधलं. घाबरल्यानं तिला काही तरी भास होत असतील, पण पाहावं तरी ती काय म्हणतेय ते, म्हणून सोन्या आणि मन्यानं पाहिलं, तर दिसलं, एक लाटच्या लाट गावाकडे जात होती. त्यांनी शेजारच्या छोट्याशा झोपडीच्या छतावर उतरत पाहिलं, त्या लाटेसारख्या वाटणाऱ्या भागाकडून आवाजही ऐकू येत होते. रानमानव! तिघांनीही एकमेकांकडे पाहिलं.

हळूहळू रानमानवांतलं नि ही तिघं जिथे थांबली होती त्या जागेतलं अंतर कमी होत चाललं होतं. झोपडीजवळून जाणाऱ्या रस्त्यावरूनच ते जाणार होते असं दिसत होतं. त्यांच्या आरोळ्या क्षणोक्षणी मोठ्या होत चालल्या होत्या. दाणदाण पाय आपटत येणाऱ्या त्या जमावामुळे हवेत धुळीचे लोट उठत होते. पण तो जमाव जसा झोपडीच्या खालच्या बाजूनंच जायला लागला तसं स्पष्ट दिसायला लागलं.

त्या रामानवांनी एक कडं केलं होतं. एका ठराविक तऱ्हेनं पावलं टाकत, तालच जणू धरत अशी मिरवणूक चालली होती. त्यांची तोंडं मध्यभागी मधूनमधून वळत होती. गोलाकार जागा सोडून ते पुढे चालले होते. चालण्याच्या लयीबरोबर त्यांचं कडं लहानमोठं होत होतं. त्यांच्या अवाढव्य आकृत्या जणू डोळयात खुपत होत्या. आणि मध्यभागी! पांढरी शुभ्र साडी नेसलेली, खाली मान घातलेली एक व्यक्ती चालली होती.

“ममता!” मंजिरी पुटपुटली.

“खरंच की!” सोन्या म्हणाला.

“काय दशा झालीय तिची!” मन्यानं म्हटलं.

“कसं सोडवायचं तिला या राक्षसांच्या तावडीतून?”

“हीच वेळ आहे. या माझ्या मागे.” मन्या म्हणाला. जय बजरंग बली म्हणून शाळेच्या तालमीतली मारुतीची मूर्ती डोळयासमोर आणत नि पाठीवरच्या पिशवीचे गोंडे दोन्ही हातांनी सर्रकन ओढत त्यानं उडी घेतली. हात खाली – वर करत वर एक गिरकी घेतली नि डोळयाचं पातं लवतं ना लवतं तोच त्या रानमानवांना काय होतंय हे कळायच्या आत पाण्यात सूर मारावा तशी खाली उडी मारली. मंजिरी नि सोन्यानंही त्याचंच अनुकरण केलं. एक, दोन, तीन- भराभर खाली वर उड्या घेत त्या रानमानवांचं कडं मोडून टाकलं. रानमानव त्या घटनेनं स्तिमित झाले होते. शत्रू आला कुठून, आकाशातून खाली की धरणीतून वर हे त्यांना कळलं नव्हतं. गोंगाटाचं किंकाळयांमध्ये रूपांतर झालं. ते सैरावैरा धावू लागले. दोन तीन जण तर जमिनीवर निश्चेष्ट पडले.

याचा फायदा ममतेला मिळाला. एकदा आपल्यावर ही कृपा करणाऱ्यांकडे दृष्टिक्षेप टाकून शेजारच्या लांबच लांब बोळकंडीत तिनं पलायन केलं.

**********************

# पराक्रमी त्रिकूट-९

## पदक लपवले

ममता गेली त्या वाटेकडे मंजिरीनं दूरवर पाहिलं. पण तिला काहीच दिसलं नाही.

"चला लवकर, त्या रानमानवांनी तिला पुन्हा गाठायच्या आत आपण तिच्याजवळ पोचायला हवं." मन्या म्हणाला.

त्यांनी तो बोळ आणि आजूबाजूच्या गल्ल्या पालथ्या घातल्या. पण ममतेचा कुठेच पत्ता नव्हता. शत्रूच्या बालेकिल्ल्यात ती नाहीशी झाली होती. काय झालं असेल तिचं कोण जाणे!

"आता काय करायचं?" मन्यानं प्रश्न केला.

"तिला जर वाटत असतं आपण तिला भेटावं, तर ती आपल्यासाठी थांबली असती. चला घरी. मला तर बुवा झोपेनं घेरलंय." सोन्या म्हणाला.

"पुरे रे तुझी झोप. उद्या जास्त दे ताणून. ही वेळ गेली, तर आतापर्यंतच्या धडपडीचा काहीच उपयोग होणार नाही. आता काय करायचं ते मंजिरी, तू ठरव." मन्यानं सूत्रं हातात घेत म्हटलं.

"मला नाही वाटत आता ममतेला आपल्या मदतीची जरुरी आहे. नाही तर तिनं काही तरी खूण करून आपल्याला सांगितलं नसतं का? आणि जेव्हा तिला जरूर वाटेल, तेव्हा ती आपल्याला नक्की बोलावेल." हे शब्द मंजिरीनं इतक्या आत्मविश्वासानं उच्चारले होते, की यावर कुणीच काही हरकत घेतली नाही, शंका उपस्थित केली नाही. ती आपल्याला कशी सूचना देईल असाही प्रश्न विचारला नाही. मंजिरी नि ममता यांच्यात जणू काही नातं निर्माण झालं होतं नि जणू बिनतारी संदेशामुळे ममतेकडून मंजिरीला निरोप मिळणार होता

"मग आता घरची वाट," मन्यानं सोन्याच्या पाठीवर थाप मारत म्हटलं नि डोळे मिचकावले. सोन्यानंही हसून त्याला उत्तर दिलं नि घराच्या दिशेला वळून चार एक पावलं टाकली.

"माझ्या मनात आलं, या पदकानं घोटाळे होताहेत. शिवाय ते बरोबर असल्यावर आपल्या जिवालाही भीती आहे. हे पदक मिळालं की त्या योद्ध्याची भ्रमंती पूर्ण होईल."

"आणि ममतेचं काय होईल?" मंजिरीनं प्रश्न केला.

"ते पदक शत्रूच्या हातात पडू नये असं वाटत असेल तर ते कुठे तरी सुरक्षित जागी ठेवायला हवं. म्हणजे आपल्याला जरूर वाटेल तेव्हा आपण ते त्या लपवलेल्या जागेतून काढून आणू."

"पदक लपवायचं? पण कुठे?"

"आहे एक जागा. म्हणजे आपल्याही डोक्यावर सारखी टांगती तलवार नको."

यावर मन्या पुढे नि सोन्या नि मंजिरी मागे असा प्रवास सुरू झाला. गावाच्या मध्यभागी एक पडका महाल होता. तिकडे मन्यानं जायला सुरुवात केली. महालाच्या जवळ एक महाविद्यालय होतं. तिथल्या घड्याळानं ठण् ठण् असे दोन ठोके दिले.

"म्हणजे ही जागा सुरक्षित आहे." मन्या म्हणाला.

"कशावरून?"

"घड्याळानं आपल्या कल्पनेला संमती दिली ना टोले देऊन." तो म्हणाला.

महालाच्या मध्यभागी असलेल्या उंच मनोऱ्यावर एक वातकुक्कुट बसवलेला होता. जोरात वारा वाहायला लागला की तो कधीकधी सर्रकन वळायचा. त्यांनी जातायेता, समोर बसस्टॉपवर उभं असताना त्या कोंबड्याकडे पाहिलं. तेव्हा तो किती उंच वाटला होता! आणि आता ती त्याच्या शेजारी उभी होती. कोंबडा चांगला मोठ्ठा दिसत होता नि केवढी थोरली दिसणारी बसस्टॉपची शेड खेळातल्या ट्रकएवढी दिसत होती.

कोंबड्याची चोच धरून ती त्यांनी आपल्या बाजूला वळवली. तिला मध्येच एक चीर होती. पेटी तर नसेल? मन्यानं असा विचार करून त्याच्या वरचा भाग उचलला. सोन्यानं खिशांतून बॅटरी काढून त्या उजेडात पाहिलं. आत रिकामी जागा होती.

"इकडे दे ते पदक," असं म्हणून मन्यानं पदक मंजिरीकडून मागून घेतलं. त्या पेटीच्या आत डाव्या कोपऱ्यात ठेवलं. त्यावर मंजिरीनं आपला रुमाल ठेवला. त्याच्याकडे पुन्हा एकदा पाहिलं आणि काळजीपूर्वक पेटीचं दार बंद केलं. उंच अशा मनोऱ्यावरच्या त्या पेटीतलं पदक कुणाच्या लक्षात सुद्धा येण्याचा संभव नव्हता. हे छान झालं. आता काळजी नको शत्रूच्या हातात पदक पडेल म्हणून.

आनंदानं मंजिरी उभी राहिली नि मनोऱ्याच्या कडेच्या दिशेनं जायला लागली.

"हं,हं, हळू, अगं –" मन्या तिच्यामागे धावला. त्या बरोबर मंजिरी थबकली. "बाईसाहेब, पिशवीचे गोंडे ओढल्याशिवाय आपल्याला उडता येत नाही म्हटलं. पडली असतीस ना खाली!"

मंजिरीनं खाली पाहिलं. त्या खोल विहिरीत- अंधाऱ्या जमीनीवर आपण पडलो असतो! तिच्या डोळयापुढे अंधारीच आली. ती मटकन खालीच बसली.

वाऱ्यानं दिशा बदलल्यावर त्या कोंबड्यानं आपली दिशा बदलली. त्याचा फर्र असा आवाज आला. तिनं डोळे उघडले. मन्या नि सोन्या पिशव्यांचे गोंडदार बंद हातात धरून तिच्या येण्याचीच वाट पाहात होते. तिनं पहिल्यांदा पाठीवरची पिशवी चाचपली. गोंडे हातात आले की नाही ते दोन दोनदा पाहिलं आणि प्रत्यक्ष मनोऱ्याच्या पुढे हवेत उडायला लागायच्या आत मनोऱ्यावरच मागे जात उडायला सुरुवात केली. पायाखालची मनोऱ्याची फरशी नाहीशी होऊन हवेचा स्पर्श तिच्या पायांना व्हायला लागला होता. अजूनही मनोऱ्याची फरशी फूटभर खाली दिसत होती. म्हणजे आता आपण नक्की नीट उडतोय! तिनं हवेत झेप घेत सोन्या मन्याला गाठलं. खालचा मनोरा दिसेनासा झाला तेव्हा क्षणभर श्वास रोखून आपल्या नीट उडण्याची आणि आपल्या हाताला चिमटा घेऊन आपण स्वप्नात नसल्याची खात्री करून घेतलीच.

आता घरं लांब नव्हतीच. घराजवळच्या बागेजवळ मैदानात ती तिघं खाली उतरली. कधी घरी जातो नि अंथरुणातल्या उबेत शिरतो असं त्यांना झालं होतं. जमीनीवर थंडी चांगलीच जाणवत होती. हाताच्या घड्या घालून नि दोन्ही हात खिशात घालून सोन्या चालला होता. मन्यानं दोन्ही हात अंगाजवळ घट्ट पण ताठ ठेवले होते. मुठी मिटलेले त्याचे हात थंडीनं किंचित थरथरत होते. मंजिरी आपल्या अंगाभोवती कोट जास्तच लपेटून घेत होती.

गल्लीच्या तोंडाशी तिघांनी निरोप घेत आपापल्या घरांकडे पाय वळवले. आधीची बाहेर पडण्याची सवय होतीच. त्या सवयीनं घरात जाऊन अंथरुणात शिरत सुटकेचा निश्वास सोडत अंगं टाकली. अखेर इतक्या दिव्यानंतर घरी येऊन पोचलो! तिघंही इतकी दमली होती की मनात गर्दी करणाऱ्या विचारांना बाजूला सारत झोपेनं त्यांचा कधी कब्जा घेतला ते त्यांनाही कळलं नाही.

ती घरी जातात न जातात तोच त्या उंच मनोऱ्यावर ज्या महालाजवळ रात्री कुणीसुद्धा फिरकायचं नाही त्या ठिकाणी आणखी एका आकाशप्रवाशानं झेप घेतली. त्यानं घाईघाईनं त्या मनोऱ्यावर सगळीकडे पाहिलं. वातकुक्कुटाच्या पायाखालची पेटी पाहाताच आपल्या लांब, अणकुचीदार बोटांनी त्यानं ती उघडली. हात आत घालून मिटल्या मुठीनं पाठीवरच्या पिशवीचे गोंडेदार बंद ओढून ती व्यक्ती निघून गेली. जर तिथे कुणी माणूस असता, तर त्याला त्या व्यक्तीच्या विकट हास्याचा ध्वनी ऐकायला मिळाला असता. पण त्या जाड चामड्याच्या चेहऱ्यावर भाव दिसणं कठीण होतं. त्याला कुणी चेहरा तरी म्हटलं असतं की नाही कोण जाणे.

दुसऱ्या दिवशी ती तिघं भेटली. रात्री थोडीशी विश्रांती झाली होती, पण तरी दमलेली तोंडं नि तारवटलेले डोळे आदल्या रात्रीच्या त्यांच्या साहसाची आठवण करून देत होते.

“पूर्वी कशी सारखी त्या कुत्र्याची धास्ती वाटायची, नाही! हल्ली त्यानं आपला पाठलाग सोडलेला दिसतोय.” मंजिरी म्हणाली.

“हो, आता तो यापुढे तो यायचाही नाही, मला वाटतं. आता पदक आपल्यापाशी कुठाय?”

“सुटले बाई. काल रात्री किती दिवसांनी सुखाची झोप लागली.”

सोन्याचा चेहरा जरा गडबडलेला दिसत होता. त्याच्याकडे पाहून मंजिरीनं विचारलं, “तुझ्या घरी काही कळलं की काय?”

त्यानं नुसती मान हलवली.

“माना काय हलवतोयस नुसत्या? काय झालं ते सांग बघू.” मन्यानं म्हटलं.

सोन्यानं एक आवंढा गिळला आणि सांगितलं, “आज चांगला पकडला जात होतो.”

“काय करताना?”

“काल विजेचं कनेक्शन नाही का तोडलं? आज सकाळी एकदम लक्षात आलं. सकाळी दात घासता घासता वीज चालू करण्यासाठी विजेच्या मीटरपाशी गेलो तेव्हाच बाबा बाहेर जायला दाराशी आले. थोडक्यात बचावलो. बिंग फुटलं असतं तर धडगत नव्हती. कसा दारामागच्या जागेत लपलो ते माझं

मला माहीत. आणि त्या दारामागे उंदराचं बीळ आहे. बापरे! असं वाटलं केव्हा उंदीर येईल नि चावेल कोण जाणे!"

"वा रे वीर! उंदराची भीती वाटते?" हसण्यामध्ये ती ताण विसरून गेली.

"आत्ता तुम्हाला हसू येतंय, पण तुमच्यावर ती वेळ आली असती म्हणजे कळलं असतं."

"बरं बाबा, आम्ही आमचं हसणं परत घेतो, झालं? पाच वाजलेत. फिरायला जायचं?"

त्यांचे पाय नकळत कालच्या दिशेला वळले. मनोऱ्यावरच्या वातकुक्कुटाकडे नजर टाकत मंजिरीनं म्हटलं, "इतक्या उंच गेलो होतो आपण!"

"हं, खरंच नाही वाटत."

त्यांनी दुसऱ्या विषयांवर बोलायला सुरुवात केली. मनोऱ्याकडे मान वर करून पाहिलं सुद्धा नाही. समजा, कुणी आपल्या मागावर असलंच तर पंचाईत नको.

त्यांचे डोळे रस्त्यावर शोध घेत होते. परतताना त्यांनी वेशीकडून यायला सुरुवात केली. सगळं काही शांत होतं. आदल्या रात्री इथं काही घडलं होतं, याची पुसटशीही खूण नव्हती. रस्त्याच्या दोन्ही कडेची घरं अर्धवट पडली होती. त्यामुळे एक प्रकारचा भयाणपणा जाणवत होता.

"कुठे गेली असेल ममता कोण जाणे!" मंजिरीला ममतेच्या आठवणीनं अस्वस्थ वाटत होतं. तिच्या मनात शंका कुशंका येत होत्या. सगळ्या वाटभर ती गप्पच होती. सोन्या मन्या काहीतरी बोलत होते.

रात्री मंजिरी झोपायला आपल्या खोलीकडे वळली तेव्हा तिची आई म्हणाली, "दारं खिडक्या नीट बंद करून झोप गं. वारा फार आहे आज." खरंच, आज वारा रोजच्यापेक्षा जास्त होताच आणि त्याचा जोर वाढतच होता. तिनं खिडक्या नीट बंद करून घेतल्या. काचेतून पाहिलं, तेव्हा झाडं जोरजोरानं हलताना दिसत होती. समोरचं नारळीचं झाड तर शेजारच्या घरावर इतकं वाकलं होतं, की कोणत्या क्षणी ते घराच्या भिंतीवर पडेल याची शाश्वती वाटत नव्हती. तिनं डोळे मिटले नि ती पलंगाकडे वळली. झाडांच्या पडण्याचा जेव्हा आवाज आला नाही तेव्हा तिनं एक दीर्घ निःश्वास टाकला नि अंथरुणावर अंग टाकलं.

मध्यरात्रीचा सुमार असावा. तिला जाग आली. दारावर कुणी वाजवतंय असं वाटून तिनं खिडकीच्या दाराकडे पाहिलं. बाहेर मंद वारा वाहात होता. मधूनच जोराच्या वाऱ्याचा आवाज येत होता. वादळाचाच आवाज असावा म्हणून ती पुन्हा डोळे मिटणार तोच तिला पुन्हा तीच 'टकटक' झालेली ऐकू आली. जवळजवळ धावतच जात ती खिडकीपाशी उभी राहिली. खिडकी उघडावी की नाही याचा निश्चय होत नव्हता. काचेला डोळे लावून तिनं पाहिलं, एक काळसरशी आकृती बाहेर उभी होती. ममता तर नसेल! खाडकन तिनं दार उघडलं. बाहेरची आकृती खिडकीजवळ सरकली.

"मंजिरी," तिनं हाक ऐकली. ममताच. मंजिरीचा जीव भांड्यात पडला.

"काय?"

"बाहेर येतेस जरा?"

"हो, आलेच."

ती दाराकडे वळली. पण बाहेरच्या आवाजानं थबकली. बागेतलं एक झाड हलत होतं. झाड! छे! एक रानमानव ममतेच्या रोखानं येत होता. मंजिरी किंचाळली. ममतेनं येणाऱ्या संकटाकडे पाहिलं. हात वर करून झटकन ती काहीतरी पुटपुटायला लागली. रानमानव एकदम मागे सरकला नि लांब जाऊन थांबला. ममतेनं मंत्र म्हणणं सुरूच ठेवलं. आता मात्र तो जीव घेऊन पळत सुटला. मंजिरी खिडकीजवळ उभी राहून सगळं पाहात होती. ममतेनं आता आणखी काही धोका पत्करायचा नाही असं ठरवलं होतं.

"मोठ्या मैदानावर ये, मी वाट पाहाते," ती पुटपुटली. दुसऱ्या क्षणी ती दिसेनाशी झाली.

खोलीबाहेर पावलांचा आवाज आला, तशी मंजिरीनं पटकन पलंगावर पडत पांघरूण अंगावर ओढून घेतलं नि डोळे मिटून घेतले. दिवा लागला. तिची आई आली होती. तिनं मंजिरीच्या अंगावरचं पांघरूण नीट केलं. मंजिरीनं डोळे उघडले.

"आई!"

"हो, आत्ता झोपेत केवढ्यांदा किंचाळलीस! म्हणून पाहायला आले. स्वप्न बिप्न पडलं होतं का?"

"असेल. मला तर नाही कळलं मी ओरडल्याचं." तिनं हसत हसत जांभई दिली.

"झोप." आईनं दिवा मालवला.

पावलांचा आवाज थांबला तेव्हा तिनं उठून बाहेर पडायची तयारी केली. कॅनव्हासचे बूट चढवले. गळ्याला स्कार्फ बांधला. कपडे ठाकठीक केले आणि ती बाहेर पडली.

मंजिरीनं मन्याच्या घरीही त्याच्या खिडकीवर ममतेसारखीच टकटक केली. त्यानं खिडकी उघडत हळूच बाहेर डोकं काढलं. "आलोच, तू सोन्याला बाहेर काढ." मन्या म्हणाला.

सोन्याही दोन मिनिटांतच बाहेर पडला. घरातून बाहेर पडताना मन्यानं त्याच्या मोठ्या भावाचा, सोन्यानं त्याच्या बाबांचा आणि मंजिरीनं तिच्या आईचा असे गॉगल घेतले. बाहेर पडताच ते त्यांनी आपल्या डोळ्यांवर चढवले. किती वेळ लागेल, कुठे जावं लागेल, काय करावं लागेल कोण जाणे! तयारीत असलेलं बरं. मन्यानं खिशातला चाकू चाचपून पाहिला, तर सोन्यानं होकायंत्र नि नकाशा, बॅटरी खिशात असल्याची खात्री करून घेतली. आता काय वाटेल ते करावं लागलं तरी हरकत नव्हती. साधनसामग्रीसह युद्धाच्या रिंगणातच उतरायला जणू ती चालली होती.

"आता आधी आपण पदक घ्यायला हवं." मंजिरी म्हणाली.

चालणं जितक्या सहजपणे शक्य होतं, तितक्याच सहजपणानं त्यांनी उडायला सुरुवात केली. जोरानं हात फडफडवत महालाच्या मनोऱ्याच्या दिशेनं ते जायला लागले. लांब दिसणारा मनोरा आता चार हातांच्या अंतरावर आला होता. मंजिरीनं एक झेप घेत मनोऱ्याच्या कडेला हात लावत वर उडी घेतली. पण छे! तिचा पाय कडेपर्यंत पोचलाच नाही. तिनं हात पसरलेले होते, म्हणून बरं, चार दोन फूट खाली गेल्यावर तिनं स्वतःला सावरलं. आतापर्यंत मनोऱ्यावर जाऊन पोचलेल्या सोन्यामन्याच्या मधे ती जाऊन पोचली.

तेव्हा कुठे तिच्या जिवात जीव आला. तरी तिच्या पोटात कसं तरी होत होतं. छातीत धडधडत होतं. आता पुन्हा पदक हातात आलं की धोका वाढणार म्हणून ती घाबरली होती. उत्सुकता जास्त न ताणता तिनं वातकुक्कुटाजवळ जाऊन पेटीच्या झाकणाला हात घातला. इकडे तिकडे पाहिलं. सोन्या आणि मन्या मागे उभे होते. तिच्या खांद्यावरून डोकावून पाहात होते. झाकण उघडलं. आत काळामिट्ट काळोख होता. तिचा हात आत गेला आणि तसाच रिकामा बाहेर आला. काय आणि कसं झालं ते तिला कळेना. ती जागा तर सुरक्षित होती. मग पदक गेलं कुठे?

"दे इकडे ते पदक," मन्या म्हणाला. ती सावकाश वळली. दोन्ही हात सरळ अंगालगत ठेवून तिनं मन्याकडे पाहिलं.

"पदक नाही तिथे."

"काय?" त्यांच्या आवाजात आश्चर्य, भीती, निराशा सगळंच होतं.

"काही तरीच, असं कसं होईल?" सोन्यानं खिशातली बॅटरी काढून तिच्या प्रकाशात पेटीचा कोपरान् कोपरा तपासला. पेटी रिकामी होती. मंजिरीच्या रुमालाचाही पत्ता नव्हता.

*****************************************

# पराक्रमी त्रिकूट-१०

## हरित मानव संपला

“आता मैदानावर ममतेला भेटायला कुठल्या तोंडानं जायचं?” मंजिरीनं एवढंसं तोंड करून म्हटलं.

“पदक नाहीसं झालंय हे खरंय, पण त्याला आपण काही जबाबदार नाही.” मन्या म्हणाला.

“पण ती बया आपल्यालाच दोष देणार.” सोन्या म्हणाला.

“काय व्हायचं ते होऊ दे. आपण खरं काय ते गेल्याबरोबर सांगून टाकू या.” मन्या म्हणाला.

ती मैदानावर उतरली, ममतेचा पत्ता नव्हता.

“तिला पायी यायला वेळ लागला असेल. मैदान आपल्या घरापासून काही अगदी जवळ नाही.” मंजिरी म्हणाली.

“आपण नाही आलो?” सोन्यानं ममतेची चूक मांडायचा प्रयत्न केला.

“आपण उडत आलोय म्हटलं.”

“खरंच की. ते मी विसरलोच होतो.”

कुंपणाच्या दाराच्या बाजूनं एक छोटीशी आकृती पुढे येताना दिसली. संथपणे पावलं टाकत खाली मान घालून ममता त्यांच्याजवळ येऊन उभी राहिली.

“फार थोडा वेळ आहे आपल्याकडे, दे ते पदक माझ्याकडे.” तिने हात पुढे केला.

तिघांनीही एकमेकांच्या तोंडाकडे पाहिलं. पहिल्यादा बोलायला कुणीच तयार होईना. पण मंजिरी सर्वात जास्त जबाबदार होती. तिला उत्तर देणं भाग होतं. तिनं सगळा धीर एकवटून ओठावरून जीभ फिरवत म्हटलं, “पदक हरवलंय.”

“हरवलंय?” ममतेचा हात एकदम खाली आला. तिनं खांदे पाडले. डोळे निराशेनं भरून आले. “म्हणजे ते पदक त्यांच्या हातात पडलं. त्यांच्या! इतका प्रयत्न करून!”

“पण आमची काहीच चूक नाही.” ती रडवेली झाली. एकानं थोडं, दुसऱ्यानं थोडं असं करत त्यांनी काय झालं ते ममतेला सांगितलं.

ममतेनं मान हलवली. “तुमची काही चूक नाही. माझ्या नशिबाची आता परीक्षा आहे. माझ्या पुण्याची आता कसोटी आहे. ठीक आहे. आता सरळसरळ सामना होऊन जाऊ दे.” ती पुटपुटत होती. तिनं पुढे म्हटलं, “आता त्याची शक्ती वाढेल. त्याच्या कमरपट्ट्यातली शक्ती वाढेल.”

“आता काय करणार तू?”

“आता राजाकडे जाऊन ते पदक मिळवणार.”

"तू एकटी?"

"हो."

"आम्ही तुला मदत करायाल तयार आहोत."

"नको." ती ताठपणे म्हणाली. ती जायला निघाली.

"तू का नाही उडत जात?" सोन्यानं विचारलं.

"पदक मिळाल्यापासून त्यांची शक्ती वाढली आहे, त्यामुळेच की काय, त्यांनी माझी उडण्याची शक्ती काढून घेतली आहे.

"आमची पिशवी घे."

"का—ही उपयोग नाही. मला उडता येणार नाही."

"म्हणून तरी आता आमची मदत घे."

"नको. आता त्यांच्यापैकी एकाजवळ माझी उडण्याची पिशवी आहे. त्यांना उडता येईल. आता तुमची त्यांना भीती राहणार नाही. आता ते तुम्हाला घाबरणारच नाहीत."

ममतानं शांतपणे पाठ फिरवून चालायला सुरुवातही केली. तिच्या चालीत निर्धार होता.

ममता दिसेनाशी झाली. आता पुढे काय करायचं हा प्रश्न कायमच होता. कोडं न सुटता जास्तच गंतागुंतीचं होत चाललं होतं. ममतेच्या मागे तिला मदत करायला जावं तरी पंचाईत, न जावं तरी पंचाईत अशी स्थिती झाली होती. काय करावं यावर एकमत होत नव्हतं. पण यावर उपाय म्हणून मंजिरीनं सुचवलं, "आपण ममतेच्या मागे जाऊ. लांबून पाहू काय होतंय ते. जरूर वाटली तर मदतीसाठी पुढे जाऊ. या माझ्या मागे."

ममता कुठे गेली हे कळत असल्यासारखं मंजिरीनं वाटाड्याचं काम पत्करलं. तिला खात्री वाटत होती, आपण जातोय तिकडेच ममता गेली आहे आणि संकटं तिची वाट पाहाताहेत. आपण तिथे जाणं आवश्यक आहे.

लांब, गावाबाहेरच्या ओसाड रस्त्याकडे तिनं आपला मोर्चा वळवला. निम्मी अधिक घरं पाडून भुईसपाट केलेली असल्यानं एक मोठं मैदान तयार झालं होतं. मधून मधून काही पाडायची राहिलेली घरं तोडक्या मोडक्या अवस्थेत उभी होती. कुणाची भिंतच पडली होती, तर कुणाची छतं नाहीशी झाली होती.

अखेर पुढच्या बाजूला ममतेला जाताना त्यांनी पाहिलं, तेव्हा त्यांना समजलं, त्यांचा अंदाज खरा होता. ते बरोबर ममतेच्या मागे आले होते. आपण आल्याचं ममतेला समजू नये म्हणून ते तिघं तिथेच थांबले. जसं अंतर भरपूर राहिलं, तसं ती पुन्हा चालायला लागली. आता ती एका छोट्या बोळातून निघाली होती. बोळ वळणं घेत चालला होता. ममतेच्या पावलांचा अस्पष्ट आवाज ऐकू येत होता. त्यांनी जमीनीकडे निरखून पाहिलं तेव्हा त्यांना पावलांचे ठसे दिसले. हत्तीच्या पायांसारखे ठसे एकमेकांत मिसळून गेले होते. त्या ठशांवरून वाटत होतं, त्या जागी पुष्कळ रानमानव आले असावेत. मन्यानं

धोक्याचा इशारा दिला. त्यांनी पाठीवरच्या पिशव्या ठाकठीक केल्या. त्यांचे बंद हातात धरूनच चालायला सुरुवात केली. कोणत्याही क्षणी उडायची तयारी असावी!

ममता पुढे जातच होती. समोरच्या उंच इमारतीच्या रोखानं ती चालली होती.

"राजवाड्यात जातेय ती." मन्या पुटपुटला. आता बोळ संपत आला होता. पावलांचे ठसे उजवीकडे वळले होते. तीही उजवीकडे पाहायला लागली. एका लांबच लांब खोलीच्या दाराशी ती उभी होती. सोन्यानं पुढे जाणाऱ्या मन्याला मगे खेचलं. खोलीत खांबच खांब होते. छे! ते हलत होते. मंजिरीनं किंकाळी फोडली. त्या आवाजानं लक्ष वेधून ते खांब- नव्हे- ते राक्षस – ते रानमानव दाराकडे वळले. सगळी खोली जणू त्या राक्षसांनी भरून गेली होती. त्यांनी पळायला सुरुवात केली. कुठे जावं ते कळत नव्हतं पण सोन्यानं डोकं ठिकाणावर ठेवून पिशवीचे बंद खेचले. मन्या सैरावैरा धावायला लागला. मंजिरी गडबडीत इकडेतिकडे पाहात ठेचकाळून पडलीच. "उडा लवकर," सोन्या ओरडला. ते ऐकून मन्यालाही सुचलं उडायचं. मंजिरीनंही उठून त्यांच्या मागे उडायला सुरुवात केली.

त्रिकुटानं दहा बारा फूट उंच जाऊन त्याच हवेलीच्या कठड्यावर थांबत खाली पाहिलं. ममता मनोऱ्याकडे चालली होती. पण रानमानवांनी तिला पाहून तिच्याकडे धावायला सुरुवात केली होती. सगळीकडे त्यांच्या किंकाळ्या हवेत भरून राहिल्या होत्या. त्यांच्यापैकी एक जण खोलीत धावला. तो बाहेर आता तेव्हा त्याच्या हातातली वस्तू लख्कन चमकली. त्याच्या हातात राजाचा कमरपट्टा होता. ममता एकाएकी थांबली. त्या पट्ट्यातल्या सामर्थ्यानं तिला एका जागी बांधून टाकलं होतं. तिनं कसोशीचे प्रयत्न करायला सुरुवात केली. हात वर उचलत मनोऱ्याकडे पाहात मंत्र म्हणायला सुरुवात केली. रानमानवांनी तिच्या दिशेनं पळण्याला आवर बसला. आता ते पुढे जात होते, पण सावकाश. पण तिनं मंत्र म्हणणं थांबवल्यावर त्यांनी तिला पुन्हा घेरलं. तिनं एक पाऊल पुढे टाकलं. पण जणू त्या सगळ्यांचं ओझं ती वाहते आहे अशा वेदना तिच्या चेहऱ्यावर दिसत होत्या. तिची आणि राजाची ही अशी लढाई चालली होती. निकालाची वेळ जवळ आली होती. त्या लढाईचा जगाशी फारसा संबंध नव्हता. वरून हे त्रिकूट हे सगळं पाहात होतं.

रानमानवांनी ममतेला घेराओ घातला होता. ती जास्त जास्तच त्यांच्या कचाट्यात सापडत होती. तिची शक्ती त्या पट्ट्याच्या शक्तीपुढे टिकाव धरू शकत नव्हती.

"आता आपण जायलाच हवं मदतीला." मंजिरी कळवळून म्हणाली. कुणाच्या उत्तराची वाट न बघता तिनं ममतेजवळ उडी मारली. मन्या नि सोन्यानंही तसंच करून दोन चार रानमानवांना खाली पाडलं.

"चल आमच्या बरोबर," मंजिरी म्हणाली.

"तुम्ही जा." ममतेचे ओठ बोलले.

"का पण?"

"तुम्ही रानात जा त्या हरितमानवाकडे. तिथे तुमची जास्त गरज आहे." ममतेनं मंजिरीला जवळजवळ ढकललंच.

हरित मानवाचं नाव काढताच रानमानवांनी एकच गिल्ला केला. ममतेला पुरतं घेरलं. त्यांनी मनातच तिचा निरोप घेतला. आता हरितमानवाकडे जायचं होतं. पहाटेच्या वेळी तिथे काहीतरी घडणार होतं. त्यांची तिथे गरज होती.

**

ती तिघं हरितमानवाकडे निघाली होती खरी, पण अजून पहाटेला अवकाश होता.

“दमलो बाबा, आता उतरू या कुठे तरी.” मन्या म्हणाला. एक दोन गोल चकरा मारत त्यांनी एका शेतात प्रवेश केला. बाजूला एक झोपडी होती.

“कोणी असेल का आत? आत जाऊन उबेत बसावंसं वाटतंय.” सोन्या म्हणाला. ते हरितमानवाच्या जवळपास पोचले होते. तिथून चाहूल घ्यावी म्हणून त्यांनी एका उंच अशा झाडाच्या शेंड्यावरून सगळीकडे पाहिलं. सगळं शांत होतं.

“मी जरा बघून येते.” म्हणून मंजिरीनं हरितमानवाच्या दिशेनं तरंगत जायला सुरुवात केली.

“एकटीच निघाली ही.”

“नको नको, आपणही जाऊ या.”

“थांब, आम्ही येतोय,” सोन्यानं हाक घातली.

पण मंजिरीनं त्यांचं बोलणं ऐकलं नव्ह्तं. ती हरितमानवाचं शरीर दिसेल, अशा ठिकाणी झाडावर जाऊन पोचली होती .

मन्यानं आकाशात झोप घेतली न घेतली तोच त्याला एक मोठी सावली वरून खाली येताना जाणवली. हात हलवून बाजूला सरकणार इतक्यात त्या सावलीनं त्याला फटका लगावला होता. त्याच्या डोळ्यांपुढे क्षणभर काजवे जमकले. त्याला एवढंच जाणवलं, आपण खाली जातोय, खोल, खोल. खालचं अरण्य वेगानं वर येतंय. त्यानं एका झाडाच्या फांदीला धडक दिली. पण सगळं बळ एकवटून प्रयत्न केला. स्वतःला सावरून घेतलं नि पुन्हा वर जायला सुरुवात केली. सोन्यानं त्या रानमानवानं मन्याला पाडताना पाहिलं होतं. सोन्याला राग आला. रानमानवाचा भावनाशून्य चेहरा खाली जाणाऱ्या मन्याकडे पाहात होता. ती संधी घेऊन सोन्यानं रानमानवाला खाली ढकललं. आता खाली जाण्याची पाळी रानमानवाची होती. मन्यानं आता त्याचा पाढलाग केला. आपल्या खिशातला चाकू काढला आणि रानमानवाच्या पाठीमागे जाऊन त्यानं त्याच्या पाठीवरच्या पिशवीचे बंदच कापून काढले. पिशवी त्या पाठीपासून दूर होऊन लांब तरंगत गेली. रानमानवानं जिवाच्या करारानं हात हलवले. पण आता त्याचा काही उपयोग नव्हता. त्याच्या किंकाळ्यांत रागाबरोबर भीतीही होती. खाली पडताना तो झाडांच्या फांद्यांनी खरचटत जमीनीवर निश्चेष्ट पडला.

सोन्या आणि मन्यानं मंजिरीचा शोध घेतला. ती एका झाडाच्या फांदीवर होती. तिकडे जायचा त्यांनी प्रयत्न केला, पण मधल्या झटापटीत ते दोघंही इतके दमले होते, की आता हातांची हालचाल सुद्धा करणं कठीण होतं. त्यांनी हात खाली घेत जमीनीच्या बाजूला प्रयाण केलं.

मंजिरीनं खाली पाहिलं. खाली जमीनीचा एक उंचवटा आणखीच उंचउंच होत होता. तिनं डोळे विस्फारून पाहिलं. हरितमानवानं आपलं डोकं उचललं होतं. कान फाटून जातील असा भयंकर आवाज काढत तो डोकं, हात, पाय असा एक एक अवयव जमीनीतून बाहेर काढत उभा राहिला. एखाद्या माशीनं गुणगुणत एखाद्याच्या डोक्यावर फेऱ्या माराव्यात त्याप्रमाणे मंजिरीनं त्याचं निरीक्षण करत फेऱ्या मारल्या.

आता त्याचं लक्ष वेधलं गेलं. खोल रिकामे डोळे वर करीत त्यानं तिच्याकडे पाहिलं. हिरव्यागार गवतानं भरून गेलेला लांब हात तिला धरण्याकरिता वर केला. तिनं एका बाजूला उडी घेत त्याचा हल्ला चुकवला. वर जात त्याच्या कपाळाकडे पाहिलं. म्हशींचा कळपच्या कळप चरेल असं त्याचं कपाळ होतं. डोंगरासारखं नाक होतं. घळीसारखं तोंड होतं. ती पुन्हा खाली आली. तिनं पट्ट्याचा शोध घेतला. तिला पट्टा दिसला. त्याला हात लावायला ती पुढे सरकली, तो तिच्या हाताला दगडाचा स्पर्श जाणवला. ती थबकली. हरितमानवाचे कपडे दगडाचे होते. तिनं दूर जाऊन पाहिलं. त्याची हालचाल बंद झाली होती. तसाच्या तसा हात वर करून त्या राजाचा पट्टा जवळ बाळगत त्या हरितमानवाचा एक न हलणारा पुतळाच बनला होता. आता काम आणखीच अवघड होतं. तिला समजलं, योद्ध्यानं हरितमानवाचा कब्जा घेतला होता. त्याच्या हुकमावर हरितमानव हलत चालत होता. त्या पुतळ्याच्या कमरेला पट्टा होता. पण ती जसजसा त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत होती, तसा हरितमानव तिला प्रतिकार करीत होता.

तरी मंजिरीनं प्रयत्न चालूच ठेवले. तिला जाणवलं, आपल्या पायाखालची जमीन सोडता सगळ्या बाजूंनी जमीन वर येत आहे. तिला जमीनीखाली गाडण्याचा शत्रूचा प्रयत्न होता तर.

तिनं पिशवीचे बंद सर्वशक्तीनिशी ओढले आणि एखाद्या रॉकेटसारखी ती बाहेर पडली. या युद्धात राजाच्या पुतळ्याखालची जमीन उंच उंच होत चालली होती. योद्धा हरितमानवाला उभं करण्याचा प्रयत्न करत होता. मंजिरीनं पुतळ्यावर एक हल्ला चढवला. आधीच वाकडा झालेला तो पुतळा आता संपूर्णपणे कोसळला. त्याचं डोकं खाली गेलं होतं. त्याच्या कमरेला तो पट्टा होता. पण त्याचं मधलं पदक उलटं झालं होतं. लढाई संपली होती. राजाचा पराजय झाला होता. जगातल्या सर्वात वाईट शक्तीला अखेर हार मानावीच लागली होती.

हरितमानवावरचा राजाचा पगडा आता संपला होता. त्यानं राजाच्या कमरपट्ट्यात हात घालून तो उचकटून काढला. तो सळ्ळकन निघाला. मंजिरीनं पुढे होत तो पट्टा हातात घेतला. तिनं हरितमानवाकडे पाहिलं. आता त्याच्या चेहऱ्यावरचा क्रूरपणा नाहीसा झाला होता. ती मागे सरकली. सोन्या आणि मन्यानं मोठाथोरला आवाज ऐकला. भूकंप झाल्यासारखी जमीन हादरली. झाडं वाकली. हरितमानवानं आ वासला आणि कोसळलेल्या राजाला तोंडात ढकललं. हरितमानवानं सगळीकडे पाहिलं. आता त्याची जरूर संपली होती. त्या आवाजाबरोबर तो एखाद्या दगडामातीच्या ढिगासारखा जमीनीवर कोसळला.

'ए ---' सोन्या-मन्यानं आवाज ऐकला. लांबून येणारी मंजिरी एखाद्या भावलीसारखी दिसत होती.

***************************

# पराक्रमी त्रिकूट-११

## बक्षीस मिळालं

ती घराजवळ पोचली, तेव्हा मात्र आता आपलं बिंग फुटणार, म्हणून ती धास्तावली होती. आपण घरी पोहोचेपर्यंत घरची सगळी नक्कीच उठली असणार. त्यांना काय सांगायचं? आणि काही सांगायचं तर तिच्याजवळ तिच्या कहाणीबद्द्ल पुरावा तरी काय होता? पण आता ममतेनं त्यांना मदत करायचं आपल्या अंगावर घेतलं होतं. तिला मदत करून त्यांनी नव्हते का तिच्यावर इतके उपकार केले?

घरात शिरायला त्यांना मुळीच त्रास पडला नाही. तिघांच्याही घरची माणसं गाढ झोपलेली होती. त्यांना आश्चर्य वाटलं. एव्हाना सगळे उठून घर गजबजलेलं असतं. पण जाऊ दे. आलेल्या संधीचा फायदा घ्यावा असा विचार त्यांनी केला.

मन्यानं त्याच्या खोलीत प्रवेश केला तेव्हा त्याचे भाऊ गाढ झोपेत होते. त्यानं आपल्या गादीकडे पाहिलं. तिथे ममता बसली होती. तो जवळजवळ दचकलाच. तिनं हात पुढे करून पट्टा मागितला. तेव्हा त्याच्या लक्षात आलं, आपण तो आपल्या कमरेला बांधलाय. तो ज्याचा त्याला सुपूर्द करून मोकळं व्हायला हवं. पट्टा काढून तिच्या हातात ठेवत त्यानं काहीतरी बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्याला शब्दच सापडेनात. तिनं हसून त्याच्या पाठीवर थोपटलंसं केलं. 'अच्छा' म्हणून ती बाहेर पडली.

मन्या फार दमला होता. काही विचार करण्याच्या परिस्थितीत राहिला नव्हता. बघता बघता तो झोपेच्या आधीन झाला.

सकाळी सुद्धा ही तिघंच घरच्या माणसांच्या आधी उठली. थोड्याशा झोपेनं सगळा श्रमपरिहार झाल्यासारखं वाटत होतं. मुख्य म्हणजे डोक्यावरचं मणामणाचं ओझं उतरावं तसं हलकं वाटत होतं. मन्यानं आपले फाटलेले कपडे कपाटात कोंबून ठेवले. नंतर बघता येईल त्यांचं काय करायचं ते. सकाळी हवा तर सुंदर पडली होती. या हवेत काही करण्यासारखं असेल, तर ते म्हणजे उडणं. त्यांनी आपल्या अंथरुणाखाली लपवलेल्या उडायच्या पिशव्या घेण्यासाठी हात घातला, खोलीभर शोध घेतला, पण त्यांचा पत्ता नव्हता.

"काही नाही, आपल्याला स्वप्नात दिसलं सगळं," तिघं भेटल्यावर सोन्या म्हणाला.

"एऽ हे रे, मग माझे फाटलेले कपडे, या अंगावरच्या ओरखड्यांच्या जखमा- फांद्यांवर बसून झालेल्या- हे सुद्धा स्वप्नातच झालं का?"

"तुझ्या डोक्यातून हे निघालं, म्हणून तुला रानात धडपडून त्याचा प्रसाद मिळाला."

"मी जातेच कशी. बसा भांडत दोघं."

"आणि काल आलेली ममता? ती सुद्धा खोटीच का?" मन्यानं प्रश्न टाकला.

"काल ममता आली होती?" मंजिरीनं विचारलं.

“हो, आली आणि पट्टा घेऊन गेली.”

“मला न भेटताच गेली?” मंजिरीच्या डोळ्यात पाणी आलं.

चार सहा महिने तसेच गेले. मंजिरी बागेत झाडांना पाणी घालत होती. शेजारी कुणी उभं आहे असं तिला वाटलं म्हणून तिनं वळून पाहिलं, तर ममता! तिनं आश्चर्यानं पाहिलं.

“इतके दिवस कुठे होतीस?”

“कामात होते. पट्टा पुन्हा नीट करायचा होता. सगळी व्यवस्था करायची होती!” तिच्या चेहऱ्यावर यशाचं समाधान होतं; पण श्रमाच्या खुणाही दिसत होत्या. “मी आले आहे तुम्हाला शाबासकी द्यायला. तुम्हाला बक्षीस हवं ना काम केल्याबद्दल?”

“आम्ही काही बक्षिसासाठी नाही केलं काम.”

“हो, पण सगळ्या गोष्टी नीट व्हायला हव्यात. तुझे मित्र कुठे आहेत?”

“त्यांच्या घरी.”

“बरं असू दे. असं करा, जिथे हरित मानव होता, तिथे जा. तिथे तुम्हाला तुमचं बक्षीस मिळेल.”

मंजिरी मन्या आणि सोन्याला हाका मारायला धावली. ती दोघं येऊन पाहातात तो काय, ममता पार गल्लीच्या टोकाशी पोचली होती. सोन्या तिच्या मागे धावला खरा, पण तोपर्यंत ममता दिसेनाशी झाली होती.

“का फसवलंस आम्हाला?” सोन्या आणि मन्या चिडले.

“ती गेली, त्याला मी काय करू?” मंजिरी म्हणाली. तिनं मग त्यांना बक्षिसाची गोष्ट सांगितली. सोन्याला ते खरं म्हणजे पटलं नव्हतं, पण चिडत का होईना, तो रानात जायला तयार झाला.

त्रिकूट पुन्हा रानात गेलं, तेव्हा काय बक्षीस असेल याच्यावर त्यांची चर्चा झाली.

“आज किती छान वाटतंय,” मंजिरी म्हणाली,” थोडी सुद्धा भीती वाटत नाहीये आज.”

“आज रानाची शांतताही गेली आहे. पशू-पक्षीही वावरताहेत.” मन्या म्हणाला.

“ज्या रंगाच्या काचेतून बघावं, तसं दिसतं.” सोन्यानं मिस्किलपणे हसत म्हटलं.

ती हरितमानवाजवळ पोचली. तिथे वारेमाप झाडी होती.

“पहा, ही एवढी झाडी आणि ही मोठी झाडं काय सहा महिन्यांत झाली आहेत?” सोन्या म्हणाला.

पण मंजिरीला तिथला हरितमानवाचा हात, पाय असं सगळं आठवत होतं. सगळीकडे शोध घेत ती त्याच्या डोळ्याजवळ पोचली. डोळ्याच्या खाचेत पाणी साठलं होतं. त्यात शांत, निळ्या आकाशाचं प्रतिबिंब पडलं होतं. आत मध्यभागी बुबुळाच्या ठिकाणी एक सोनेरी पदार्थ तरंगत होता. मंजिरीनं पुढे होत ती वस्तू उचलली. ती सोनेरी बशी होती. त्या बशीवर घोड्याचं आणि लढणाऱ्या योद्ध्यांचं चित्र होतं. तेच त्यांचं बक्षीस होतं.

परतताना त्यांनी ममतेच्या घराकडे मोर्चा वळवला. पण तिथे जातात तो काय, घराचा लवलेशही नव्हता. शेकडो वर्षांची झाडं वाढलेली असावीत तशी रानाची अस्ताव्यस्त वाढ झालेली दिसत होती. याचा अर्थ ममता त्यांना पुन्हा कधी भेटणार नाही!

गावात परतल्यावर त्यांनी त्यांचं बक्षीस वस्तुसंग्रहालयाला भेट देऊन टाकलं.

एका पुराणस्तु संशोधकानं वस्तुसंग्रहालयात ती सोन्याची बशी पाहिली आणि त्याची उत्सुकता चाळवली गेली. त्यानं मुलांच्या सांगण्यावरून ती बशी सापडली तिथे उत्खनन केलं.

मन्यावर तो संशोधक खूष होता. मन्यानं बोलता बोलता हरितमानवाची थिअरी त्या संशोधकाला सांगितली, ती ऐकून त्याला फारच आश्चर्य वाटलं होतं. आणखी खोदल्यावर हरितमानवाचं जिथे तोंड होतं, त्या तोंडाच्या आत एक मोडकळीला आलेला माणसाचा सांगाडा सापडला. त्याच्या ह्रदयाच्या जागी सोन्याचा साठा सापडला आणि त्याच्या जवळच खोलवर पुरलेली एक हजारो वर्षांपूर्वीची बोट.

संशोधक कामात गढून गेला. मंजिरी, मन्या आणि सोन्या यांनी एकमेकांकडे पाहिलं नि तिघंही हसले. त्यांच्या डोळयात अभिमान आणि समाधान दिसत होतं.

************समाप्त*************